RNI No. - MAHMAR 2023/84526

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com

❑ वर्ष - १ ❑ अंक -२५२ ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ शनिवार दि.९ डिसेंबर २०२३ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## सावधान! मेफ्टाल स्पास पेनकिलर खाताय? सरकारकडून धोक्याचा इशारा

**दि.९विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

छोट्या–मोठ्या दुखण्यावर आपण सहज पेनकिलर घेतो. काही पेनकिलर मेडिकलमध्ये सहज उपलब्ध असतात. मासिक पाळीच्या वेळी पोटदुखीवर इलाज किंवा साधारण अंगदुखीवर इलाज म्हणून अनेक जण मेफ्टल स्पास घेतात. ही गोळी अनेक घरांमध्ये सहज उपलब्ध असते. तुम्हीही अशा कारणासाठी मेफ्टाल स्पास गोळी घेत असाल तर, सावधान या गोळीच्या तुमच्या शरीरावर दुष्परिणाम होऊ शकतो. केंद्र सरकारने मेफ्टाल स्पास गोळीबाबत इशारा दिला आहे.




केंद्र सरकारने पेनकिलर मेफ्टाल स्लासच्या वापराबाबत इशारा दिला आहे. या गोळीचं सेवन करताना काळजी घेण्याचा इशारा आरोग्य मंत्रालयाने दिला आहे. या गोळीमध्ये आढळणारे मेफेनेमिक सिड गंभीर एलर्जिक रिएक्शनसाठी कारणीभूत ठरू शकतं. मेफेनेमिक सिड ड्रेस म्हणजेच इओसिनोफिलिया आणि सिस्टमॅटिक सिंप्टम्स सिंड्रोम निर्माण करु शकतो, त्यामुळे याचा वापर योग्य पद्धतीने करण्यासाठी सरकारने इशारा दिला आहे.

मेफेनेमिक सिड चा वापर करून मेफ्ताल स्पास तयार करण्यात येते. संधिवात , ऑस्टियोआर्थरायटिस यासारखे हाडांचे रोग, तसेच मुलींमध्ये मासिक पाळीत वेदना, सामान्य वेदना, सूज, ताप आणि दातदुखी यावर उपचार करण्यासाठी याचा वापर केला जातो. वृत्तसंस्था पीटीआयने दिलेल्या वृत्तानुसार, आयपीसीनेआपल्या सुरक्षिततेचा इशारा देत म्हटलं आहे की, फार्माकोव्हिजिलन्स प्रोग्राम ऑफ इंडिया डेटाबेसमधून मेफ्ताल स्पास गोळीच्या दुष्परिणामांच्या प्राथमिक विश्लेषणातून ड्रेस सिंड्रोम झाल्याचं समोर आलं आहे.

ड्रेस सिंड्रोम काही औषधांमुळे होणारी गंभीर एलर्जी आहे. यामुळे शरीरावर रिक्शन होते, ज्यामुळा त्वचेवर लाल रंगाचे चट्टे किंवा व्रण उठतात, ताप येतो किंवा लिम्फ नोड्स या ग्रंथींना सूज येते. हे एलर्जी रिक्शन गोळ्यांचे सेव केल्यानंतर दोन ते आठ आठवड्यांमध्ये दिसू शकते.

### अलर्टमध्ये काय म्हटलं?

आयपीसीने ३० नोव्हेंबरला जारी केलेल्या अलर्टमध्ये म्हटलं आहे की, 'डॉक्टर, रुग्ण आणि ग्राहकांना औषध च्या वापराशी संबंधित दुष्परिणामांच्या संभाव्यतेचे बारकाईने निरीक्षण करण्याचा सल्ला दिला जातो. औषध घेतल्यानंतर तुम्हाला शरीरात कोणत्याही प्रकारची रिक्शन दिसल्यास संबंधितांनी www.ipc.gov.in – किंवा Android मोबाइल ADR PvPI आणि PvPI हेल्पलाइनद्वारे एक फॉर्म भरून मदत मिळवू शकता आणि तक्रार नोंदवू शकता.

## 'कोण आला रे कोण आला, जरांगेचा बाप आला'; टी.पी. मुंडेंच्या घोषणेने नवा वाद?

**दि.९विदर्भ प्रजासत्ताक पुणे**

जिल्ह्याच्या इंदापूरमध्ये आज ओबीसी मेळावा पार पडत असून, याच सभेतून टी.पी. मुंडेंच्या घोषणेने नवा वाद निर्माण होण्याची शक्यता आहे. कारण मनोज जरांगे यांच्यावर टीका करतांना, 'कोण आला रे कोण आला जरांगेचा बाप आला' अशी घोषणा मुंडे यांनी दिली आहे. त्यांच्या या वक्तव्यामुळे आता नव्या वादाला तोंड फुटण्याची शक्यता आहे. तर, यावर आता जरांगे यांची काय प्रतिक्रिया असणार आहे हे पाहणं महत्वाचे असणार आहे.



दरम्यान, यावेळी बोलतांना टी.पी. मुंडे म्हणाले की, मराठा समाजाने आपले शोषण केलं. बाबासाहेब आंबेडकर यांचा फोटो तरी आहे का? जरांगेच्या शेजारी आणि आरक्षण मागतो आहे. २०२४ साली ओबीसीचे मुख्यमंत्री छगन भुजबळ झाले पाहिजे. तसेच, उपमुख्यमंत्री प्रकाश शेंडगे यांना करा आणि यांना वठणीवर आणायचे असेल तर गृहमंत्री टी.पी. मुंडे यांना करा. आमच्या हाताला ऊस तोडून फोड आले. आता पाटील तुम्ही बाजूला सरा आणि कोयता तोडण्याऱ्याना चाव्या द्या. दोस्ती भुजबळ साहब के साथ होती है, जरांगे सारख्या गद्दारी करणे वालो से नही होती. कोण आला रे कोण आला जारांगेचा बाप आला. तो म्हणतो पांढऱ्या दाडीचा, त्याचा बापाची केस पांढरे आहेत. बापाची केस पांढरे असणार की, जरांगे जरा जपून बोला. जालना येथे हल्ला झाला, पण निलंबित फक्त ओबीसी समाजाचे अधिकारी झाले. शिंदे सरकारला सांगतो आहे, त्यांना ताबडतोब कामावर घ्या, असेही मुंडे म्हणाले.

## पंतप्रधान नरेंद्र मोदी ठरले जगातील सर्वाधिक लोकप्रिय नेते

**दि.९विदर्भ प्रजासत्ताक नवीदिल्ली २०**

जगातील सर्वाधिक लोकप्रिय नेत्यांच्या यादीत पंतप्रधान मोदींनी अव्वल स्थान पटकावले आहे. मॉर्निंग कन्सल्टनुसार, ७६ टक्केच्या मान्यता रेटिंगसह पंतप्रधान मोदी हे सर्वात लोकप्रिय जागतिक नेते ठरले. जागतिक स्थरावर पसंतीच्या बाबतीत मेक्सिकोचे राष्ट्राध्यक्ष ओब्राडोर या सर्वेक्षणात दुसऱ्या क्रमांकावर आहेत, त्यांना ६६ टक्के रेटिंग मिळाले आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष जो बायडन ३७ टक्के स्वीकृती रेटिंगसह ८व्या स्थानावर आहेत, तर त्याच सर्वेक्षणात, इटलीच्या पंतप्रधान जॉर्जिया मॅलोनी ४१ टक्के रेटिंगसह ६व्या स्थानावर आहेत. या वर्षी सप्टेंबरमध्ये मॉर्निंग कन्सल्टने पीएम मोदींना जागतिक स्तरावर सर्वात विश्वासू नेता म्हणून वर्णन केले होते. मॉर्निंग कन्सल्टने केलेल्या या सर्वेक्षणात ७६ टक्के लोकांनी पंतप्रधान मोदींच्या नेतृत्वाला मान्यता दिल्याचे समोर आले आहे.



मॉर्निंग कन्सल्टने केलेल्या सर्वेक्षणात असे समोर आले आहे की लोकप्रियतेच्या बाबतीत पीएम मोदींना ७६ टक्के मान्यता मिळाली आहे. पीएम मोदींशिवाय इतर देशांच्या नेत्यांचाही या सर्वेक्षणात समावेश आहे, ज्यांना त्यांच्यापेक्षा कमी रेटिंग मिळाले आहे. यामध्ये इटलीच्या पीएम जॉर्जिया मॅलोनी यांचाही समावेश आहे.

त्याच वेळी, सप्टेंबरमध्ये केलेल्या सर्वेक्षणात असे समोर आले होते की ७६ टक्के लोकांनी पीएम मोदींच्या नेतृत्वाला मान्यता दिली होती आणि त्यांना सर्वात विश्वासार्ह नेता देखील म्हटले होते, तर केवळ १८ टक्के लोकांनी त्यांच्या विरोधात मत व्यक्त केले होते. मॉर्निंग कन्सल्ट निवडून आलेल्या नेत्यांची साप्ताहिक मान्यता रेटिंग तयार करते. या सर्वेक्षणात पीएम मोदी सातत्याने शीर्षस्थानी आहेत, त्यांचे अप्रूव्हल रेटिंग बहुतांशी ७०च्या वर आहे.

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष जो बायडन हे ४० टक्के मान्यता रेटिंगसह सातव्या क्रमांकावर होते, जे मार्चपासून सप्टेंबरमध्ये त्यांचे सर्वोच्च आहे. जी-२० शिखर परिषदेच्या समारोपानंतर हे सर्वेक्षण करण्यात आले, ज्यामध्ये पंतप्रधान मोदींना सर्वोच्च रेटिंग मिळाले. यादीतील शीर्ष १० नेत्यांमध्ये, कॅनडाचे पंतप्रधान जस्टिन ट्रूडो यांना सर्वाधिक ५८ टक्के नापसंत रेटिंग होते आणि ते पहिल्या दहा यादीत १०व्या क्रमांकावर होते.

## अजित पवार तातडीने दिल्लीला जाण्याची शक्यता, कांदा निर्यात बंदीमुळे राजधानीतील हालचाली वाढल्या

**दि.९विदर्भ प्रजासत्ताक नागपुर**

केंद्र सरकारनं घेतलेल्या कांदा बंदच्या निर्णयामुळे आता शेतकऱ्यांच्या डोळ्यात पाणी आलंय. केंद्र सरकारने कांद्याला प्रतिक्विंटल ३७०० रुपयांचा दर मिळताच निर्यातबंदीचा निर्णय घेतल्यानंतर त्याचे तीव्र पडसाद उमटायला सुरुवात झाली आहे. दिल्लीत सोमवारी महत्त्वाची बैठक होणार आहे. या बैठकीला उपमुख्यमंत्री अजित पवार जाण्याची शक्यता आहे. केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री डॉ. पवार यांनी पीयूष गोयल यांची भेट घेतली. कांदानिर्यात बंदीविरोधात पुनर्विचार करावा अशी मागणी केंद्रीय मंत्री डॉ. भारती पवारांची पियुष गोयल यांच्याकडे मागणी केली आहे.



कांदा प्रश्नावर सोमवारी दिल्लीत महत्त्वाची बैठक होणार आहे. मंत्री पीयुष गोयल यांच्यासोबत होणार बैठक होणार आहे. राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार याच्यासह नाशिकमधील व्यापारी राहणार बैठकीला उपस्थित राहण्याची शक्यता आहे. केंद्राने कांदा निर्यात बंदी केल्याने जिल्ह्यातील कांदा लिलाव बंद आहेत. मंत्री पियुष गोयल, नितीन गडकरी यांची भेट घेणार असल्याची माहिती आमदार दिलीप बनकर यांची माहिती आहे. दिल्लीत होणाऱ्या बैठकीत काय तोडगा निघतो हे पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे. कांद्याच्या निर्यात बंदीमुळे शेतकरी हवालदिल झाला आहे. त्यामुळे केंद्र सरकारमार्फत लावण्यात आलेल्या या निर्यात बंदीविरोधात पुनर्विचार करावा अशी विनंती त्यांनी केली. जेणेकरून कांदा उत्पादक शेतकऱ्यांवर त्याचा नकारात्मक परिणाम होणार नाही आणि त्यांना योग्य भाव मिळू शकेल अशी मागणी केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री डॉ. भारती पवार यांनी वाणिज्यमंत्री पीयूष गोयल यांच्याकडे केली असता त्यांनी सकारात्मता दर्शवली. कांदा निर्यातबंदीनंतर कांद्याच्या दरात घसरण होत आहे. मराठवाड्यातील कडा बाजारपेठेत कांद्याला प्रतिकिलो २५ रूपये दर मिळाला आहे. कांद्याच्या दरात घसरण झाल्याने शेतकरी आर्थिक संकटात आहे. कांद्याची निर्यात सुरू असताना कांद्याला ५० रुपयांचा भाव मिळायचा मात्र आता कांद्याची निर्यात अचानक रद्द केल्याने कांद्याच्या भावात मोठी घसरण झाली आहे. एकरी ५० हजार रुपये खर्च करून बाजारात विक्रीसाठी आणलेल्या कांद्याला कमी भाव मिळत असल्याने केलेला खर्च देखील शेतकऱ्यांना मिळणार असल्याचे शेतकरी सांगत आहेत.

## रोखठोक भूमिका घेणारे नेतृत्व सहकाऱ्यांची बाजू घेताना अडखळत..., रोहित पवारांचा अजित पवारांना टोला

**दि.९विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

नवाब मलिक... यांच्यावरुन सध्या राजकीय वातावरण तापले आहे. नवाब मलिक यांनी राष्ट्रवादीच्या अजित पवार गटासोबत जाण्याचा निर्णय घेतला. त्यांच्या या निर्णयाला भाजपने कडाडून विरोध केला. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नवाब मलिक आपल्यासोबत नको असे पत्रही अजित पवारांना लिहिले आहे. या पत्रातून नवाब मलिक यांच्यावर झालेले आरोप पाहता त्यांना महायुतीमध्ये घेणे योग्य नसल्याचे म्हटले. या सगळ्याभोवती राज्यात राजकीय घमासान पाहायला मिळते. अशात आता रोहित पवार यांनी अजित पवार यांचे नाव न घेता ते स्वतःच्याच सहकाऱ्यांची बाजू घेताना कसे अडखळत आहेत, असे म्हटले आहे.

यासंदर्भात रोहित पवारांची एक्सवर एक सूचक पोस्ट केली आहे. प्रशासनावर पकड असलेले, कार्यक्षम, स्पष्टवक्ते, रोखठोक भूमिका घेणारे नेते म्हणून ओळख असलेले



नेतृत्व आज स्वतःच्याच सहकाऱ्याची बाजू मांडताना अडखळत आहे, हे बघून अत्यंत वाईट वाटतं. भाजपला केवळ सांगकामे नेतृत्व आवडतं. स्वयंभू नेतृत्व त्यांना नको असतं म्हणूनच त्यांच्याकडून लोकनेते संपवले जातात. आता वैचारिक मतभेद असले तरी एक क्षमता असलेला लोकनेता भाजपच्या रणनीतीचा शिकार होत आहे, याचं दुःख सर्व सहकाऱ्यांसह सर्वसामान्यांनाही नक्कीच आहे, असे रोहित पवार यांनी म्हटले आहे.

दरम्यान, हिवाळी अधिवेशनादरम्यान पहिल्याच दिवशी विधिमंडळात नवाब मलिक हे अजित पवार गटाच्या बाजूला बसले. यावरून विरोधकांनी सरकारला घेरले. यानंतर देवेंद्र फडणवीसांनी नवाब मलिकांना अजित पवार गटात सहभागी करून घेण्यावरून आपली नाराजी व्यक्त केली. त्यांनी रीतसर पत्र लिहून नवाब मलिकांच्या सरकारमधील समावेशाला आपला विरोध असल्याचे स्पष्ट केले. यावरून भाजप व अजित पवार गट या दोन सत्ताधाऱ्यांमध्ये विसंवाद निर्माण झाल्याचे चित्र दिसून आले. त्यामुळे यावरून तर्कवितर्कांना उधाण आलेले असताना अजित पवारांनी आज सकाळी माध्यमांशी बोलताना नवाब मलिकांची भूमिका अद्याप स्पष्ट झालेली नसल्याचे सांगितले आहे.

## खासदार नवनीत राणा यांनी घेतली उपमुख्यमंत्री अजित पवार यांची भेट

**दि ९ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती २१**

अमरावतीच्या अपक्ष खासदार नवनीत राणा यांनी आज उपमुख्यमंत्री अजित पवार यांची भेट घेतली. लोकसभा निवडणूक तोंडावर असताना नवनीत राणा यांनी अजित पवार यांची भेट घेतल्याने राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आलं आहे. नवनीत राणा आगामी लोकसभेची निवडणूक अजित पवार गटाकडून लढणार का? असा चर्चा सुरू झाल्या आहेत.राज्याचे उपमुख्यमंत्री



जेंव्हा मज़हय जिल्ह्यात येतात तेंव्हा खासदार या नात्याने त्यांचे स्वागत करने हे माझे कर्त्यव्य आहे. आणि युवा स्वाभिमान पक्ष ही एनडीए च घटक पक्ष आहे. आम्ही दादांसोबत नेहमीच होतो दादा ला आम्ही नेहमीच समर्थन दिल आहे.त्यानी मला टिकिट दिली त्यामुळे आपनत्याचे ऋणी तर राहणार आहोत असे ही खासदार राणा म्हणाल्यात.

## नोटा मोजणारी ४० मशिन्स थकल्या हातानं मोजणारेही गार पडले २५० कोटी जप्त अन् १३६ बॅगा अजूनही मोजायच्या बाकी

**दि.९विदर्भ प्रजासत्ताक ओडिशा**

काँग्रेसचे राज्यसभा खासदार धीरज प्रसाद साहू यांच्या ओडिशा आणि रांची येथील ठिकाणांवर आणि डिस्टिलरी ग्रुप आणि त्यांच्याशी संबंधित संस्थांवर आयकर विभागाचे छापे सुरू आहेत. या छाप्यात आतापर्यंत बेहिशेबी रोकड जप्त करण्यात आली आहे. त्याचा आकडा २९० कोटी रुपयांच्या पुढे जाऊ शकतो. कोणत्याही तपास



एजन्सीने एका कारवाईत जप्त केलेला हा आतापर्यंतचा सर्वाधिक काळा पैसा आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार आतापर्यंत २५० कोटींहून अधिक रोकड जप्त करण्यात आली असून ओडिशातील सरकारी बँक शाखांमध्ये रोख रक्कम सतत जमा केली जात आहे. या नोटा बहुतांशी ५०० रुपयांच्या आहेत.

### १३६ बॅगा मोजायची बाकी आहेत

भारतीय डइख बालंगीरचे प्रादेशिक व्यवस्थापक भगत बेहरा म्हणाले की, 'सध्या आम्ही दोन दिवसांत सर्व पैसे मोजण्याच्या उद्देशाने एकत्र काम करत आहोत. ५० कर्मचारी पैसे मोजत आहेत आणि इतरांना लवकरच आमच्यात सामील होण्यासाठी बोलावले आहे. आम्हाला १७६ पैशांच्या पिशव्या सापडल्या आहेत आणि आम्ही फक्त ४० पिशव्या मोजल्या आहेत, आता बाकी आहेत. पॅकेट्सची मोजणी सुरू आहे. आम्ही मोजलेल्या ४६ पिशव्यांमध्ये ४० कोटी रुपये सापडले. याशिवाय दागिन्यांची ३ सुटकेस सापडली आहेत. तितलागढमध्येही काही रक्कम मोजण्यात आली मात्र रक्कम अद्याप स्पष्ट झालेली नाही. आयकर आणि पोलीस विभागाने बँक परिसरात सुरक्षा व्यवस्था पूर्ण केली आहे.

## संपादकीय ......

# आपली भूमिका काय याचाच त्यांना विसर पडलेला

*नागपूर विधिमंडळात गुरुवारपासून राज्याचे हिवाळी अधिवेशन सुरू झाले. ७ डिसेंबर ते २० डिसेंबर असे १४ दिवस हे अधिवेशन चालणार आहे. यातील ४ दिवस सुट्ट्यांचे वगळल्यास प्रत्यक्षात केवळ १० दिवसच सत्ताधारी आणि विरोधकांमधील पकडापकडीचा खेळ रंगणार आहे. कोणे एकेकाळी विधिमंडळ अधिवेशन किमान तीन आठवडे तरी चालायचे. म्हणजे कामकाज व्हायचे. अनेक महत्त्वाचे प्रश्न, त्यातही प्रामुख्याने विदर्भातील प्रश्न पटलावर यायचे, परंतु सध्याच्या घडीला सत्ताधारी–विरोधकांच्या गदारोळात सभागृहाचे कामकाज आठवडाभर चालले तरी मोठी बाब मानायला हवी. राज्यातील मंत्र्यांना नागपूरची थंडी अनुभवायची असते किंवा त्यातील अनेकांना संत्री खायला आवडतात म्हणून राज्य शासन दरवर्षी अख्खे मंत्रिमंडळ नागपुरात हलवून हिवाळी अधिवेशन नागपुरात घेते, असा सर्वसामान्यांचा समज होत असेल, तर ते चुकीचा ठरू नये.*

*याचे कारण म्हणजे नागपूरमध्ये पाय ठेवताच येथील वातावरणात स्थिरस्थावर होण्यासाठी काही दिवस आणि पुढे परतीच्या प्रवासाआधी शॉपिंग, नैसर्गिक वातावरणातील फेरफटक्यात आठवडा कसा उलटून जातो हे आपल्या मंत्री महाशयांना कळतदेखील नसेल. अशा सगळ्या व्यग्र दिनक्रमात विदर्भवासीयांच्या समस्या मांडण्याची फुरसत तरी कुणाकडे असेल. विदर्भातील जनतेच्या प्रश्नांकडे लक्ष वेधण्यासाठी व त्यांच्या समस्या सोडविण्यासाठी प्राधान्याने नागपूरमध्ये हिवाळी अधिवेशन घेण्यात येते, परंतु या अधिवेशनात विदर्भातील जनतेचे किती प्रश्न मांडले जातात आणि त्यांच्या प्रश्नावर किती चर्चा होते याचे उत्तर सरकारच देऊ जाणे. १९५६च्या राज्य पुनर्रचनेनुसार विदर्भ प्रांताच्या समावेशानंतर १ मे १९६० रोजी संयुक्त महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली.*

*संयुक्त महाराष्ट्रात विदर्भ प्रांताचा समावेश करण्याआधी १९५३ साली पश्चिम महाराष्ट्र व विदर्भातील काँग्रेस नेत्यांमध्ये एक करार झाला होता. त्याला 'नागपूर करार' असे म्हटले जाते. विदर्भाचे महत्त्व अधोरेखित करण्यासाठी राज्याचे हिवाळी अधिवेशन नागपूरमध्ये घेण्याची तरतूद या करारात करण्यात आली होती. त्यानुसार विधिमंडळाचे एक अधिवेशन म्हणजे हिवाळी अधिवेशन हे नागपूरमध्ये घेतले जाते. संयुक्त महाराष्ट्राच्या स्थापनेपासून ते आतापर्यंत नागपुरात हिवाळी अधिवेशन घेऊनदेखील इतर प्रांताच्या तुलनेत विदर्भ मागे आहे हे मान्य करावे लागेल. हिवाळी अधिवेशनाच्या एक दिवस आधी राज्य सरकारच्या चहापानाच्या कार्यक्रमावर प्रथेनुसार विरोधकांनी बहिष्कार घातला.*

*यातून नेमके काय साध्य झाले हे कळायला मार्ग नाही, परंतु मागील काही वर्षांपासून सुरू असलेली ही कुप्रथा पाळली गेली. चहापान कार्यक्रमावर बहिष्कार घालण्यामागील कारणं विरोधकांनी सत्ताधार्यांना एका पत्राद्वारे दिली, मात्र विरोधकांच्या पत्रात विदर्भ आणि मराठवाड्याच्या समस्यांचा उल्लेखच नाही. त्यामुळे विरोधी पक्षाला विदर्भ आणि मराठवाड्याचा संपूर्ण विसर पडलेला आहे, अशा शब्दांत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी खिल्ली उडवली. खरेतर सत्ताधार्यांपुढे जनतेचे प्रश्न ठेवणे आणि त्यांचा पाठपुरावा करणे हे विरोधकांचे काम, परंतु सध्या विरोधक मोदी लाटेत इतके उद्धवस्त झाले आहेत की आपण नेमके कोण आहोत आणि आपली भूमिका काय याचाच त्यांना विसर पडलेला आहे.*

# अन्नधान्य, कडधान्य व गळीतधान्य पिकांसाठी राज्यांतर्गत पिकस्पर्धा योजना

## शेतकऱ्यांनी पिकस्पर्धेत सहभागी होण्याचे आवाहन

**अधिक माहितीसाठी** www.krishi.maharashtra.gov.in **संकेतस्थळला भेट द्या**



दि.९विदर्भ प्रजासत्ताक अमरावती, राज्यामध्ये पिकाची उत्पादकता वाढविण्यासाठी विविध भागांमध्ये शेतकऱ्यांकडून विविध प्रयोग करण्यात येतात व उत्पादकतेत वाढ करण्यात येते. अशा प्रयोगशील शेतक–यांना मिळालेल्या उत्पादकतेबाबत प्रोत्साहन देऊन गौरव केल्यास त्यांची इच्छाशक्ती, मनोबल यामध्ये वाढ होऊन आणखी उमेदीने नवनवीन अद्यावत तंत्रज्ञानाचा वापर केला जाईल. यामुळे कृषि उत्पादनामध्ये भर घालण्यासाठी शेतकऱ्यांचे योगदान मिळेल. तसेच त्यांचे मार्गदर्शन परीसरातील इतर शेतकऱ्यांना होऊन राज्याच्या एकूण उत्पादनात मोलाची भर पडेल, हा उद्देश ठेऊन राज्यांतर्गत पीकस्पर्धा योजना राबविण्यात येत आहे. त्यात विभागातील अधिकाधिक शेतकऱ्यांनी सहभागी होण्याचे आवाहन कृषी संचालक दिलीप झेंडे यांनी केले आहे.

वंचित/दुर्लक्षित तसेच पौष्टिक तृणधान्य पिकांच्या क्षेत्रात आणि उत्पादन तंत्रज्ञानात वाढ होण्याची आवश्यकता विचारात घेऊन तसेच जास्तीत जास्त शेतकरी पिक स्पर्धांमध्ये सहभागी होतील या दृष्टीकोनातून शासन निर्णयानुसार रब्बी हंगाम २०२३ पासून पिकस्पर्धा तालुका, जिल्हा व राज्य पातळीवर राबविण्यात येणार आहे. त्यानुसार कृषी विभागामार्फत रब्बी हंगाम २०२३ मध्ये सर्वसाधारण व आदिवासी गटासाठी ज्वारी, गहू, हरभरा, करडई व जवस या ५ पिकांसाठी पिकस्पर्धेचे आयोजन करण्यात येत आहे. ज्वारी, गहू, हरभरा, करडई व जवस एकूण पाच रब्बी पिकांचा पिकस्पर्धेत समावेश आहे.

स्पर्धेत भाग घेण्यासाठी शेतकऱ्याकडे स्वतःच्या नावे जमीन असणे व ती जमीन तो स्वतः कसत असणे आवश्यक आहे. स्पर्धेत भाग घेणाऱ्या शेतकऱ्याला एकाचवेळी एकापेक्षा जास्त पिकासाठी स्पर्धेत भाग घेता येईल. पिकस्पर्धेमध्ये सहभागी लाभार्थींच्या स्वतःच्या शेतावर त्या पिकाखाली किमान ४० आर क्षेत्रावर सलग लागवड असणे आवश्यक आहे, याप्रमाणे पात्रतेचे निकष राहतील.

विहित नमुन्यातील अर्ज (प्रपत्र–अ), ठरवून दिलेले प्रवेश शुल्क भरल्याचे चलन, ७/१२, ८–अ चा उतारा, जात प्रमाणपत्र (केवळ आदिवासी असल्यास), पिकस्पर्धेसाठी शेतकऱ्याने संबंधित ७/१२ वरील घोषित केलेल्या क्षेत्राचा चिन्हांकित केलेला नकाशा, बँक खाते चेक/पासबुकच्या पहिल्या पानाची छायांकित प्रत आदी आवश्यक कागदपत्रे अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

ज्वारी, गहू, हरभरा, करडई व जवस या पीकांसाठी अर्ज दाखल करण्याची अंतीम तारीख ३१ डिसेंबर, २०२३ आहे. तालुकास्तर, जिल्हास्तर, व राज्यस्तरावर स्पर्धेअंतर्गत प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाचे विजेते निवडण्यात येतील. पीकनिहाय सर्वसाधारण गटासाठी तीनशे रुपये तर आदिवासी गटासाठी १५० रुपये स्पर्धेसाठी प्रवेश शुल्क आहे.

तालुका पातळीवर पहिले बक्षीस पाच हजार रुपये , दुसरे बक्षीस तीन हजार रुपये, तिसरे बक्षीस दोन हजार रुपये राहिल. जिल्हापातळीवर पहिले, दुसरे व तीसरे बक्षीस अनुक्रमे दहा हजार, सात हजार व पाच हजार राहील. तसेच राज्यपातळीवर पहिले, दुसरे व तीसरे बक्षीस अनुक्रमे ५० हजार, ४० हजार व ३० हजार रुपये राहील.

दुय्यम तसेच पौष्टिक तृणधान्य पिकांच्या क्षेत्रात आणि उत्पादनात वाढ व्हावी याकरीता जास्तीत जास्त शेतक–यांनी पिकस्पर्धेत सहभागी व्हावे, असे आवाहन कृषी विभागामार्फत करण्यात आले आहे. पिकस्पर्धेबाबत अधिक माहितीसाठी शेतकरी बंधुभगिनींनी संबंधित तालुका कृषी अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा किंवा महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागाचे स ं क े त स् थ ळ ु.ज्ञीळीहळ.ारहरीरीहीं.सीं.ळप ला भेट द्यावी, असे आवाहन कृषि संचालक (विस्तार व प्रशिक्षण) दिलीप झेंडे यांनी प्रसिध्दी पत्रकाद्वारे केले आहे.

# सरकारी नोकरीच्या शोधात आहात?

## रेल्वे, बँकेसह विविध ठिकाणी बंपर भरती

**नोकरी विशेष**

**दि.९विदर्भ प्रजासत्ताक** – तुम्ही सरकारी नोकरीच्या शोधत असाल तर ही बातमी तुमच्यासाठी फार महत्त्वाची आहे. अनेक ठिकाणी भरती सुरु आहे. कुठे भरती सुरु आहे, अर्ज नोंदणी कधी सुरु होईल, अर्ज दाखल करण्याची शेवटची तारीख कधी आहे, ही सर्व माहिती थोडक्यात तुम्हाला येथे मिळेल. भरतीसंदर्भातील अधिक माहिती तुम्हांला अधिकृत वेबसाईटवर मिळेल. यानंतर नेमक्या कोणत्या भरतीसाठी अर्ज करायचा हे तुम्ही ठरवू शकता.




**RRC NR भरती २०२३–** रेल्वे रिक्रूटमेंट सेल उत्तर रेल्वेने ३०९३ पदांसाठी पात्र उमेदवारांकडून अर्ज मागवले आहेत. अर्ज प्रक्रिया अद्याप सुरू झालेली नाही. अर्ज प्रक्रिया ११ डिसेंबरपासून सुरु होईल. अर्ज करण्याची अंतिम तारीख ११ जानेवारी २०२४ आहे. या भरतीमध्ये एकूण ३०९३ शिकाऊ पदांसाठी भरती केली जाईल. अर्ज करण्यासाठी आणि तपशील जाणून घेण्यासाठी, तुम्हाला ठठउ छठ च्या ीीलपीं.ीस. या अधिकृत वेबसाइटला भेट देऊ शकता.

**आयडीबीआय बँकेत भरती–** इंडस्ट्रियल डेव्हलपमेंट बँक ऑफ इंडियाने स्पेशलिस्ट कॅडर ऑफिसरच्या पदासाठी अर्ज मागवण्यात आले आहेत. या भरतीसाठी ज्या उमेदवारांना फॉर्म भरायचा आहे, ते ळवलळलरपज्ञ.ळप या बँकेच्या अधिकृत वेबसाइटला भेट देऊन अर्ज दाखल करू शकतात. अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया ९ डिसेंबरपासून सुरू झाली असून अर्ज दाखल करण्याची शेवटची तारीख २५ डिसेंबर २०२३ आहे. या भरती मोहिमेद्वारे एकूण ८९ पदांची भरती केली जाईल.

**शिपिंग कॉर्पोरेशनमध्ये नोकरीची संधी–** शिपिंग कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लिमिटेड कडून मास्टर मरीनर्स आणि मुख्य अभियंताच्या पदांसाठी भरती करण्यात येणार आहेत. या भरतीसाठी अर्ज प्रक्रिया सुरू झाली असून मुदत संपण्यासाठी अवघे काही दिवस शिल्लक आहेत, त्यामुळे शेवटच्या तारखेची वाट न पाहता वेळीच अर्ज़ दाखल करा. या भरतीसाठी अर्ज दाखल करण्याची शेवटची तारीख ११ डिसेंबर आहे. इच्छुक उमेदवार www.shipindia.com या अधिकृत वेबसाइटवर अर्ज दाखल करु शकतात.

### १३ व १४ डिसेंबर रोजी मराठवाड्यातील

# दुष्काळ पाहणीसाठी केंद्रीय पथक येणार



## विदर्भाचे काय?

**दि.८विदर्भ प्रजासत्ताक छत्रपती संभाजीनगर** : यावर्षी राज्यातील अनेक भागात अपेक्षित पाऊस झाला नसल्याने दुष्काळ सदृश परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे, मराठवाड्यातील दुष्काळ पाहणीसाठी केंद्रीय पथक येणार आहे. केंद्रीय कृषी मंत्रालयाचे १२ सदस्यांचे पथक राज्यातील दुष्काळ व खरीप नुकसानीचा आढावा घेण्यासाठी मराठवाड्यातील वेगवेगळ्या जिल्ह्याचा दौरा करणार आहे. १३ व १४ डिसेंबर रोजी मराठवाड्यातील चार जिल्ह्यांची केंद्रीय पथक पाहणी करणार आहे. ज्यात, छत्रपती संभाजीनगर, जालना , बीड आणि धाराशिव जिल्ह्यांतील काही तालुके व गावांना हे पथक भेट देणार असल्याची माहिती मिळत आहे. तसेच पाहणी केल्यावर १५ डिसेंबर रोजी पथक पुण्यात बैठक घेऊन अहवाल केंद्र शासनाला देईल. विशेष म्हणजे, केंद्रीय कृषी विभागाच्या सहसचिव प्रिया राजन या पथकप्रमुख असणार आहे.

मराठवाड्यात यंदा अपेक्षित पाऊस झाला नसल्याने आठही जिल्ह्यातील अनेक भागात दुष्काळ सदृश्य परिस्थिती पाहायला मिळत आहे. त्यामुळे शेतकरी मोठ्या अडचणीत सापडला आहे. त्यातच उरल्यासुरल्या पिकांचे अवकाळी पावसामुळे नुकसान झाले आहेत. त्यामुळे राज्य सरकारप्रमाणेच केंद्र सरकाने देखील मदत करण्याची मागणी केली जात होती. दरम्यान, याच पार्श्वभूमीवर आता केंद्रीय पथक मराठवाड्यातील वेगवेगळ्या जिल्ह्यांचा दौरा करून नुकसानीची पाहणी करणार आहे. त्यानंतर हे पथक पुण्यात एक बैठक घेऊन अहवाल केंद्र शासनाला पाठवणार आहे. त्यामुळे, केंद्रीय पथकाच्या दौऱ्यानंतर दुष्काळग्रस्त भागातील शेतकऱ्यांना काय मदत मिळणार हे पाहणं महत्वाचे असणार आहे.

केंद्रीय कृषी विभागाच्या सहसचिव प्रिया राजन या पथकप्रमुख आहेत त्यांच्या नेतृत्वात चार पथक तयार करण्यात आले आहेत. यामध्ये एमआयडीएचे सचिव मनोज के., सहसंचालक जगदीश साहू नीति आयोगाचे संशोधन अधिकारी शिवचरण मीना, पाणीपुरवठा विभागाचे अतिरिक्त सल्लागार ए. मुरलीधरन जलसंपदा विभागाचे संचालक हरीश उंबरजे, ग्रामविकास विभागाचे उपसचिव प्रदीपकुमार, पुरवठा विभागाचे सचिव संगीतकुमार, पशुसंवर्धन विभाग सहआयुक्त एच. उपसचिव प्रदीपकुमार, पुरवठा विभागाचे सचिव संगीतकुमार, पशुसंवर्धन विभाग सहआयुक्त एच. आर. खन्ना, कापूस विकास विभागाचे संचालक डॉ. ए. एच. वाघमारे, एमएनसीएफसीचे उपसंचालक डॉ. सुनील दुबे, एमआयडीएचे कन्सलटंट चिराग भाटिया यांचा पथकात समावेश आहे.




# रोजच्या आहारातील रवा अनेक आजारांवर फायदेशीर

## जाणून घ्या रव्याचे आरोग्यास होणारे फायदे

**दि.८विदर्भ प्रजासत्ताक**

रवा हा अनेक पौष्टिक तत्वांनी समृद्ध असतो, त्यामध्ये औषधी गुणधर्म असतात, जे अनेक आजारांशी लढण्यासाठी आपल्या शरीराला (क्शरश्रींह) ऊर्जा देतात. सकाळची न्याहारी ते रात्रीचे जेवण, तुम्ही प्रत्येक वेळी वेगवेगळ्या प्रकारे रव्याचा आहारात समावेश करू शकता. रवा अनेक पदार्थांमध्ये मुख्य घटक म्हणून वापरला जातो. रवा प्रामुख्याने रोजच्या आहारातील नाश्त्याचा पदार्थ आहे. प्रत्येक भारतीय स्वयंपाकघरात रवा असतोच. रवा गव्हापासून बनविला जातो.

रवा रोगप्रतिकारशक्ती वाढविण्यासाठी उपयुक्त पदार्थ आहे. रवा मूत्रपिंडाची कार्यक्षमता सुधारण्यास उपयोगी आहे. रव्याचा समावेश आपल्या आहारात वेगवेगळ्या पदार्थांच्या साहाय्याने करता येतो. उपमा, रवा इडली, डोसा, उत्तपा, शिरा, लाडू असे विविध पौष्टिक पदार्थ रव्यापासून बनवता येतात. धावपळीच्या आयुष्यात रवा एक पौषक अन्न पदार्थ म्हणून कार्य करतो.

रव्याचे पौष्टिक तत्व

रवा हा अनेक पौष्टिक तत्वांनी समृद्ध आहे. त्यामध्ये अनेक औषधी गुणधर्म असतात. रवा प्रोटीन, कार्बोहायड्रेट, फायबर, कॅल्शियम, लोह, मॅग्नेशियम यांचा चांगला स्रोत आहे. यामध्ये व्हिटॅमिन बी६, व्हिटॅमिन बी१२, व्हिटॅमिन अ आणि डी भरपूर प्रमाणात आढळतात. हे सर्व पोषक तत्व आपल्या आरोग्यासाठी फायदेशीर आहेत. हे फायदे नेमके कोणते ते जाणून घेऊयात.



**रव्याचे आरोग्यासाठी फायदे**

**मधुमेहावर नियंत्रण** – रवा मधुमेह रोगींसाठी उत्तम आहार आहे. याचं कारण म्हणजे रवा मॅग्नेशियम आणि फायबरचा चांगला स्त्रोत आहे. जे रक्तातील साखरेची पातळी सुधारण्यास मदत करतात.

**हृदयाचे आरोग्य–** आहारात रव्याचा वापर केल्याने शरीरात रक्तप्रवाह सुरळीत कार्य करण्यास मदत होते. यामुळे हृदयविकाराच्या झटक्याचा धोका टळतो. रव्यात आयर्नची भरपूर मात्रा आढळल्यामुळे हे शरीरात रक्ताची कमी पूर्ण होते.

**वजन नियंत्रण** – रव्यामध्ये मुख्य म्हणजे फॅट्स आणि कोलेस्ट्रॉल नसतं त्यामुळे आपले वजन कमी होण्यास मदत होते. रव्यामध्ये भरपूर फायबर असते. त्यामुळे अन्न पचण्यास जास्त वेळ लागत नाही.

**हाडे मजबूत होण्यास मदत** – रव्याच्या नियमित सेवनानं हाडांचे आरोग्य सुधारतं. रवा हाडं, मज्जातंतू आणि स्नायूंना निरोगी ठेवण्यास मदत करते. हाडे आणि सांध्यांच्या मजबूतीसाठी रव्याचे पदार्थ खाणं फायदेशीर ठरते.

**पचनक्रिया नियंत्रण** –फायबरने समृद्ध असलेल्या रव्यामुळे पचनक्रिया सुरळीत होते. ज्यामुळे अपचन, बद्धकोष्ठता यांसारख्या पचनाच्या समस्या उद्भवत नाहीत.

# आरटीओच्या सतर्कतेमुळे ३८ गोवंश वाचले

## ४३ लाखांचा मुद्देमाल जप्त, कंटेनरचालक पसार

**दि.९ विदर्भ प्रजासत्ताक वरुड** – वरूड तालुक्यातील पुसलानजीक असणार्या आरटीओ नाक्यावर आरटीओ अधिकार्याच्या सतर्कतेमुळे नुकतेच ३८ गोवंशांना जीवदान मिळाले. या प्रकरणी पोलिसांनी पुढील कारवाई करीत एकूण ४३ लक्ष ३० हजाराचा मुद्देमाल हस्तगत केला आहे. परंतु गोवंशाची वाहतूक करणारा कंटेनर चालक घटनास्थळावरून पसार झाला आहे. प्राप्त माहितीनुसार, पांढुर्णा ते अमरावती महामार्गावर गुरूवार, ७ डिसेंबर रोजी रात्री ७ वाजताच्या सुमारास पांढुर्णा येथून वरूडकडे जाणार्या कंटेनरला आरटीओ अधिकारी प्रमोद सरोदे यांनी थांबवून वाहनात कशाचा माल आहे, असे वाहनचालकाला विचारले असता यामध्ये भुसा घेऊन जात असल्याचे त्याने सांगितले. परंतु चौकशी दरम्यान वाहनाच्या आतून काहीतरी आवाज आल्याने सरोदे यांचा संशय बळवला. त्यांनी कंटेनर चालकाकडे वाहनाचे दस्तावेज व वाहनातील मालाच्या बिलाबाबत विचारणा केली. तेव्हा चालकाने कंटेनरमधून खाली उतरताच तेथून पळ काढला. सरोदे यांनी या वाहनाची तपासणी केली असता यामध्ये गोंवश कोंबून असलेले आढळून आल्याने त्यांनी या प्रकरणी पुढील कारवाईसाठी शेंदूरजनाघाटचे ठाणेदार सतीश इंगळे यांच्याशी संपर्क केला.घटनेचे गांभीर्य लक्षात घेता पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत कंटेनर वाहन ताब्यात घेत पंचनामा केला. यातील कोंबून ठेवलेल्या ३८ गोवंशाची मुक्तता करीत त्यांना पुढील पालनपोषणासाठी शेंदूरजनाघाट येथील ठढज रश्रशीीं–पशीी गौरक्षणामध्ये देण्यात आले. अशा प्रकारे पोलिसांनी १३ लक्ष ३० हजार रूपयांचे गोवंश व ३० लक्ष रूपायांचा कंटेनर असा एकूण ४३ लक्ष ३० हजाराचा मुद्देमाल जप्त केला. पसार झालेल्या कंटेनर चालकाचा शोध पोलिस घेत आहे. ही कारवाई शेंदूरजनाघाटचे ठाणेदार सतीश इंगळे, विष्णू पवार, कुंदन मुधोळकर, सागर लेव्हरकर, वसीम शेख, वीरू अमृतकर यांनी केली आहे.



### तुषार भारतीय मित्र परिवार व अमरावती जिल्हा थलेटिक्स संघटनेच्या वतीने

# हाफ मॅरेथॉन अटल स्पर्धेच्या कार्यालयाचे उद्घाटन

**दि.९ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती** –तुषार भारतीय मित्र परिवार यांच्या वतीने गुरुकुल गुरुकुल बहुउद्देशीय शिक्षण संस्था व अमरावती जिल्हा अथलेटिक संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यस्तरीय मॅरेथॉन स्पर्धेचे रविवार २५ डिसेंबर २०२३ रोजी सकाळी ५:४५ वा नेहरू मैदान , राजकमल चौक अमरावती येथे आयोजन करण्यात आले आहे.

राज्यस्तरीय हाफ मॅरेथॉन अटल रोड स्पर्धेच्या मुख्य कार्यालयाचा उद्घाटन सोहळा शनिवार दि ९ डिसेंबर २०२३ रोजी सायं ६:३० वा देसाई मेन्शन , यवतमाळ अर्बन बँकजवळ , राजपुरीया मेडिकलच्या बाजूला , राजकमल चौक रोड , अमरावती येथे संपन्न होणार असून यावेळी आमदार प्रवीण पोटे , गेल इंडिया कंपनी संचालक रवी कोल्हे , श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाचे सचिव प्रा रवींद्र खांडेकर , विदर्भ केसरी डॉ संजय तिरथकर , प्रामुख्याने उपस्थित होते समाजा च्या सर्वांगीण स्वास्थ्या साठी गुरुकुल बहुउद्देशीय शिक्षण संस्था सातत्याने प्रयत्नशील राहिली आहे शारीरिक आणि मानसिक स्वास्थ्य उत्तम असेल तरच विचार सकारात्मक राहतात आणि समाज म्हणून आपला खऱ्या अर्थाने विकास होती , अशी भूमिका राज्यस्तरीय हाफ मॅरेथॉन अटल




स्पर्धा आयोजनाच्या मागील असल्याचे मत मुख्य आयोजक भाजपा नेते तुषार भारतीय यांनी केल आहे.

राज्यस्तरीय हाफ मॅरेथॉन अटल दौड स्पर्धा नेहरू मैदान येथून प्रारंभ होऊन राजकमल चौक , राजापेठ , कल्याण नगर , मोती नगर , राजेंद्र कॉलनी , कॉग्रेस नगर , हॅलो कॉर्नर जिल्हाधिकारी कार्यालय , पंचवटी चौक , शेगाव नाका , विलास नगर , जुना कॉटन मार्केट , जयस्तंभ , जवाहर गेट , गांधी चौक , गौरक्षण चौक , भूतेश्वर चौक , रवीनगर , नवाथे चौक , राजापेठ , राजकमल आणि समारोप नेहरू मैदान होणार आहे .या स्पर्धा मध्ये सहभागी होणाऱ्या स्पर्धकांसाठी ५ लाख रोख रक्कम , सर्टिफिकेट व मेडल्स बक्षीस स्वरूपात मिळणार आहे.

ही स्पर्धा सर्वांसाठी खुली असून जास्तीत जास्त स्पर्धकांनी

**वयोगट**- (१) १४ वर्षाआतील – मुले ३ घच मुली ३ KM (२) १६ वर्षाआतील – मुले ५ घच मुली ३ KM(३) २० वर्षाआतील – मुले ८ KM मुली ५ KM (४) ४० वर्षावरील। – पुरुष ५ KM महिला ५KM(५) खुला वर्ग महिला/पुरुष(Run For Fun) ३-घच.

**खुला वयोगट** (१) पुरुष व महिला – १० KM(२) पुरुष व महिला – २१ KM

आपली नाव नोंदणी www.ataldaud.com या लिंक वर जाऊन ऑनलाइन नावनोंदणी १ डिसेंबर ते १५ डिसेंबर २०२३ पर्यंत करावी तसेच अधिक माहितीसाठी ९८२३३५ ५०१२ , ९७६४१९ ८९८६ , ९३७२७९ ०२८१, ९८८८११ १९१८ , ९५५२५७ ७७७८ , ७२७६८१९७३९ , ७७०९८०० ०५८ संपर्क साधावा सोबतच मुख्य कार्यालय उदघाटन सोहळ्याला उपस्थित राहण्याचे आवाहन गुरुकुल बहुउद्देशीय शिक्षण संस्थेचे अध्यक्ष भाजपा नेते तुषार भारतीय व अमरावती जिल्हा थलेटिक्स संघटनेचे सचिव अतुल पाटीलांच्या वतीने करण्यात आले

# सहकारी संस्था गटसचिवांनी दिला आंदोलनाचा इशारा

**दि.९विदर्भ प्रजासत्ताकअमरावती** – केंद्र व राज्य सहकार खात्याच्या अंतर्गत जिल्हा समितीच्या मान्यतेने कार्यरत असलेल्या प्राथमिक कृषी सहकारी पतसंस्थेत नियुक्त पदावर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्या न सोडविल्यामुळे बेमुदत धरणे आंदोलनाचा इशारा देण्यात आला. त्याबाबतचे निवेदन पुणे येथील सहकार विभागांचे सहकार आयुक्त भाप्रसे अनिल कवडे यांना दिले.



महाराष्ट्र राज्य सहकारी संस्था गटसचिव कर्मचारी संघटना संलग्न भारतीय मजदूर संघाच्या वतीने राज्य सहकारी सेवेत समाविष्ट करण्याकरिता विषयानुसार गटसचिवांचे नियंत्रण सहकार विभागाशी संलग्न करून जिल्हा उपनिबंधक यांच्या अधिपत्याखाली जिल्हास्तरीय समितीमार्फत संस्था नियुक्त सचिव यांना कार्यान्वित करण्यात यावे, जिल्हास्तरोप समितीच्या पूर्व मान्यतेने आणि जिल्हा देखरेख समितीच्या नियंत्रण व्यवस्थित काम करणारे सचिव व कर्मचारी यांना समान काम समान वेतन लागू करण्यात यावे, संस्थेला आस्थापन खर्च करण्याकरिता पोककर्ज वसुलीवर दोन टक्के गाळा अपुरा होत असल्याने गटसचिव, कर्मचारी यांच्या वेतनाची हमी शासनाने घ्यावी आदी मागण्यांचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधीसह जिल्ह्यातील सर्व सहकार विभागातील निबंधक विभागीय कार्यालयात देण्यात आली.

# २० डिसेंबर पासून बहिरम यात्रा महोत्सवाला होणार सुरुवात

## १८ डिसेंबरला पूजा; पंचायत समिती कडून पाहणी

**दि.९विदर्भ प्रजासत्ताक चांदूर बाजार :** मध्यप्रदेश आणि महाराष्ट्राच्या सीमेवर विदर्भातील सर्वात अधिक काळ चालणाऱ्या बहिरम यात्रा महोत्सवाला २० डिसेंबरपासून सुरुवात होत आहे. त्याआधी १८ डिसेंबरला मंदिरामध्ये होम-हवन, पूजा करण्यात येणार असल्याची माहिती विश्वस्त मंडळाचे सदस्य किशोर ठाकरे यांनी दिली आहे.

बहिरम यात्रा ही सर्वदूर प्रसिद्ध आहे. त्यामुळे या यात्रेच्या देखरेखीची जबाबदारी चांदूर बाजार पंचायत समिती कार्यालयाकडे असते. यात्रा सुरू होण्याआधी त्याठिकाणी पंचायत समिती मधील विस्तार अधिकारी ईश्वर सातांगे यांनी स्वच्छतेबाबत पाहणी केली. हजारो कुटुंबाचे आराध्यदैवत बहिरमबाबा (भैरव) म्हणून हे मंदिर ओळखले जाते. असे असले तरी या ठिकाणी येणारे भाविक भैरवबाबाच म्हणतात. बहिरमबाबा हे नवसाला पावणारे असल्याने अनेकांची त्या ठिकाणी श्रद्धा आहे. मध्य प्रदेशच्या सीमेवर असल्याने त्या ठिकाणी मध्य प्रदेशमधील भाविकांची गर्दी मोठ्या प्रमाणात पाहायला मिळते.

बहिरम बाबाला आपले नवस पूर्ण किंवा फेडण्यासाठी त्या ठिकाणी आधी नरबळी किंवा बकरीची बळी दिली जात होती. मात्र, ती परंपरा आता मोडीत



चालली आहे. ही यात्रा एकेकाळी तमाशासाठी प्रसिद्ध होती. आ. बच्चू कडू यांनी या भागातील शेतकरी, शेतमजूर कुटुंब तसेच गदारोळाचा विचार करीत तमाशा बंद केला, गेल्या काही वर्षात यात्रेचे स्वरूप बदलले आहे. यात्रेमध्ये भागवत सप्ताह, रिंगण सोहळा, शंकरपट, शासकीय योजनांचे मेळावे आदी नवनवीन सामाजिक उपक्रम राबविले जात आहेत.बहिरम यात्रेदरम्यान शिरसगाव कसबा पोलिसांचा चोख बंदोबस्त असतो. यात्रेतील प्रसिद्ध असलेले हंडीतील भाजी आणि रोडगे याचा आस्वाद अनेकांना दूरवरून या ठिकाणी येण्यास भाग पाडतो. अमरावती जिल्ह्यातीलच नव्हे तर इतर जिल्हे- राज्यातूनही भाविक या यात्रेला हजेरी लावत असतात.

# नागपूर अधीवेशनावर सोमवारी काँग्रेस चा हल्लाबोल मोर्चा

# अमरावती जिल्ह्यातून १० हजार कार्यकते मोर्चात सहभागी होणार

### जिल्हाध्यक्ष बबलू देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली नियोजनाची बैठक

**दि९विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**– अमरावती ,शेतकऱ्यांना नुकसानभरपाई ,वाढती महागाई, बेरोजगारी कर्मचारी जुनी पेन्शन,शासकीय कार्यालयात रिक्तराज्यातील अंगणवाडी सेविका ,मदतनीस यांच्या समस्या, आधी सर्व महत्त्वाचे मुद्द्यार् शासन गंभीर नसल्याने त्यांना या समस्यांची जाणीव करून देण्याकरिता येत्या ११ डिसेंम्बर रोजी काँग्रेस नागपूर आधीवेशनवर हल्लाबोल' करणार आहे,अमरावती जिल्ह्यातील ग्रामीण भागातून १० हजारांवर कार्यकते या मोर्चात सहभागी होणार असून शुक्रवारी मोर्चाच्या नियोजन करण्यात जिल्हाध्यक्ष बबलू देशमुख व वीरेंद्र जगताप यांच्या उपस्थिती पार पडली,यावर्षी खरीप हंगामात सुरूवातीला झालेली अतिवृष्टी व नंतर पावसाचा पडलेला खंड तसेच येलो मोझेंकचे आक्रमण, गुलाबी बोंडअळीचा प्रादुर्भाव, जंगली जनावरांचा हैदोस व सततची विद्युत लोडशेडींग यामुळे कापूस, सोयाबीन, घान, तूर इत्यादी पिक पुर्णतः उध्वस्त झाले आणि आता पडलेला अवकाळी पाऊस व गारपिटीने उरल्यासुरल्या खरीप हंगामाच्या पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. तसेच रब्बी हंगामातील धान, गहू व हरबरा या पिकांसह संत्रा, द्राक्षे, आंबा, डाळींब, पपई, केळी, ऊस या पिकांचे देखिल प्रचंड नुकसान झालेले आहे. परंतू केंद्र व राज्य सरकारच्या नियतीत खोट असल्याने खरीप हंगामातील नुकसान झालेल्या पिकांसाठी दुष्काळ जाहिर केला नाही. तसेच शासन स्तरावरून कोणतीही आर्थिक मदत अथवा पिकविमा देखिल दिला नाही. हे सरकार शेतकरी विरोधी असल्याने यांच्याकडून कोणत्याही प्रकारच्या मदतीची अपेक्षा आता उरलेली नाही. तसेच वाढती महागाई, बेरोजगारी यांमुळे सर्वसामान्य जनतेचे देखिल जगणे कठीण झालेले आहे म्हणून या खोकेबाज, धोकेबाज व चालबाज सरकारच्या विरोधात आवाज उठविण्याकरिता प्रांताध्यक्ष नाना पटोले यांच्या निर्देशावरूनजिल्ह्यातील स्थानिक



पातळीवरील विविध मुद्यांवर नागपूर येथे प्रदेश काँग्रेस कमिटीतर्फे ११ डिसेंम्बर रोजी सकाळी ११ वाजता हल्लाबोल मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे.

या मोर्चात ग्रामीण मधून १० हजार कार्यकर्ते सहभागी होणार आहे,याचे नियोजन शुक्रवारी काँग्रेस भवन येथे पार पडलेल्या बैठकीत करण्यात आले,यावेळी जिल्हाध्यक्ष बबलू देशमुख व वीरेंद्र जगताप यांनी नियोजनाबाबत सूचना दिल्या,

बैठकीलाजिल्हा समन्वयक किशोर गजभिये, मोहम्मद बदरू जमा निरीक्षक दर्यापूर विधानसभा ,किरण कुमरे निरीक्षक तिवसा विधानसभा, प्राध्यापक संजय बोडके निरीक्षक अचलपूर विधानसभा, महेश गणगणे निरीक्षक मोर्शी विधानसभा, जिल्हाध्यक्ष बबलूभाऊ देशमुख,माजी आमदार वीरेंद्रभाऊ जगताप,सुधाकरभाऊ भारसाकडे ,हरिभाऊ मोहोड,कांचनमालाताई गावंडे,प्रदीपभाऊ देशमुख, प्रवीणभाऊ मनोहर रामेश्वरभाऊ अभ्यंकर,मुकद्दर खाँ पठाण व्यासपीठावर तर बाळासाहेब हिंगणीकर,दयारामजी काळे,श्रीकांत गावंडे,संजय वानखडे मार्डिकर,गिरीश कराळे,प्रदीप देशमुख,सुनील गावंडे,रामेश्वर अभ्यंकर,दिलीप काळपांडे,साहेबराव भदे मुकुंदराव देशमुख,सतीश पारधी,समाधान दहातोंडे, सुरेश आडे,मयूर देशमुख,वैभव मलवार,श्रीनिवास सूर्यवंशी,अमोल होले,गणेश आरेकर, मनोज गेडाम,अमोल चिमोटे,अमोल बोरेकर,नंदकिशोर यादव,नामदेव तनपूरे,किशोर देशमुख,किशोर देशमुख,भाई देशमुख,भैय्यासाहेब मेटकर,विनोद चौधरी, प्रशांत भोयर,अनिल वरदे, संजय लायदे, विलास बोरेकर, अमोल धवसे,निशिकांत जाधव,अक्षय पारसकर,विकी राठोड,सहदेव बेलकर,प्रफुल राऊत,हिम्मतराव मंदासे,राजाभाऊ टवलारकर,अब्दुल नइम, प्रमोद तसरे,नरेंद्र मकेश्वर,गजानन मकेश्वर,विनोद भालेराव,विनोद पवार,सेतू देशमुख,मिर्झा जहीर बेग,मुमताज अली,अब्दुल कलीम,प्रदीप देशमुख,जलील पठाण,सच्चिदानंद बेलसरे,सुनील तायडे,सिद्धार्थ बोबडे,नीरज कोकाटे,विनायक ठाकरे, उपस्थित होते.

नियोजनाकरिता विधानसभा निहाय निरीक्षक जाहीर११ डिसेंम्बर च्या हल्लाबोल आंदोलन च्या नियोजन करण्याकरीत प्रदेश काँग्रेस कमिटी कडून आठ विधानसभा निहाय निरीक्षक जाहीर केले आहे, यामध्ये अमरावती करिता अशोक बोबडे,बडनेरा करिता अविनाश देशमुख, धामणगाव राहुल ठाकरे, दर्यापूर बदरू झामा, तिवसा किरण कुमरे, मेळघाट अब्दुल जब्बार, अचलपूर संजय बोडखे,मोर्शी महेश गनगणे यांचा समावेश आहे.

# कुलगुरूपदाच्या अर्ज छाननीत ७५ उमेदवार बाद?

**दि.९विदर्भ प्रजासत्ताक अमरावती :** संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या नवव्या कुलगुरू पदासाठी एकूण ११५ अर्ज प्राप्त झाले पैकी तब्बल ७५ जणांचे अर्ज बाद होणार आहेत. आता ४० उमेदवारांच्या अर्जाचा कुलगुरू पदासाठी विचार केला जाणार असल्याची माहिती आहे. त्याअनुषंगाने कुलगुरू पदासाठी उमेदवारांच्या अजीत अटी, शर्ती,शैक्षणिक पात्रतांची तपासणी करण्यात येत आहे. पुणे येथे ४ डिसेंबर रोजी कुलगुरू निवड समितीची पहिली बैठक पार पडली. यात अर्जाची छाननी करण्यात आली. अमरावती विद्यापीठाच्या कुलगुरू पदासाठी राज्यभरातून उमेदवारांचे अर्ज प्राप्त झाले आहेत. यात दिल्ली, मध्य प्रदेशातूनही अर्ज असल्याची माहिती आहे. शासनाने अमरावती



विद्यापीठाच्या नवीन कुलगुरू निवडीसाठी चार सदस्यीय समितीचे गठन केले आहे. त्यात अध्यक्षपदी कानपूर येथील आयआयटीचे डॉ. संजय धांडे तर सदस्य म्हणून सुरत येथील एसव्हीएनआयटीचे डॉ. अनुपम शुक्ला, लखनी विद्यापीठाचे डॉ. मनोज दीक्षित तर नोडल अधिकारी म्हणून पुणे येथील शासकीय अभियांत्रिकीचे हा सुजित परदेशी यांचा समावेश आहे.

अमरावती विद्यापीठाचे नव्या कुलगुरू पदासाठी अनेक जण इच्छुक आहेत. काही परिवारातून तर काही राजकीयदृष्ट्या फिल्डिंग लावत आहेत मात्र कुलगुरू पटावर योग्य व्यक्ती विराजमान व्हावी, यासाठी वरिष्ठपातळीहून सोशल इंजिनिअरिंगचा प्रयोग राबविला जाणार आहे.

# अचलपूर बाजार समितीत 'एमपी'तून अडीच लाख मक्याची पोती आयात

**दि.९विदर्भ प्रजासत्ताक अचलपूर**– अचलपूर आणि लगतच्या तालुक्यात मक्याचे उत्पादन घेतले जात नसल्याने या तालुक्यातून मक्याची आवक अत्यंत तुरळक असते. मात्र ही उणीव मध्यप्रदेश राज्याने भरून काढली आहे. या वर्षी मध्यप्रदेशात पोषक नैसर्गिक वातावरणामुळे मक्याचे भरघोस उत्पन्न झाले आहे. अचलपूर बाजार समितीमध्ये २ हजार रु प्रती क्विंटल ते २ हजार २०० रू प्रती क्विंटल भाव मिळत असल्याने शेतकरी आठवडी बाजाराच्या



दिवशी मोठया प्रमाणात मका विक्रीसाठी आणत आहे. बाजार समितीमध्ये अन्य कृषी मालापेक्षा सर्वत्र मकाच दिसत असून आदिवासी महीला आणि पुरुप शेतकऱ्यांची मोठी गदी पाहायला मिळत आहे.अचलपूर बाजार समितीमध्ये यावर्षी मोठया प्रमाणात मक्याची आवक झाली असून आजपर्यंत तब्बल २ लाख ५८ हजार १६२पोते मक्याची विक्री करण्यात आली आहे. नोव्हेंबर २०२३ पासुन बाजार समितीमध्ये मका येण्यास सुरुवात झाली. या महिन्यात २ लाख ७० हजार ६२ पोते मका विक्रीसाठी आणण्यात आला. तर उर्वरित मका डिसेंबर महिन्यात आणण्यात आला. डिसेंबरच्या अखेरपर्यंत ही आवक ३० लाख कट्ट्यापर्यंत पोहचेल अशी शक्यता वर्तविण्यात येत आहे. मका प्रमाणेच सोयाबीनचीसुद्धा चांगल आवक झाली आहे. ही आवक जानेवारी महिन्यांपर्यंत सुरू राहणार आहे. यावर्षी सोयाबीनचे ७१ हजार १७३ पोते, गहू ८ हजार ९८८ पोते, हरभरा १ हजार २२३ पोते तर तुरीचे २०५ पोत्याची विक्री झाली असुन त्यापोटी बाजार समितीला २४ लाख ८४ हजार ९८५ रूपये उत्पन्न प्राप्त झाले आहे. मक्याचे ३१ लाख असे एकूण ५३ लाख ७५ हजार इतके उ बा समितीला प्राप्त झाला आहे.

# संविधान सभेचे सदस्य ब्रजलाल बियाणी यांच्या समूह छायाचित्राचे अनावरण

## ब्रजलाल बियाणी संविधान सभेचे सदस्य असणे ही गौरवाची बाब- ओमप्रकाश लड्डा

**दि.९विदर्भ प्रजासत्ताक अमरावती** – भारतीय संविधान सभेचे वऱ्हाड प्रांतातील दुसरे सदस्य ब्रजलाल बियाणी यांच्या शतकोत्तर जयंतीनिमित्य भारतीय संविधान समितीमध्ये त्यांचा समावेश असलेल्या समूह छायाचित्राचे ६ डिसेंबर रोजी श्री.ब्रजलाल बियाणी शिक्षण संस्थेच्या परिसरात अनावरण करण्यात आले. ब्रजलाल बियाणी हे संविधान सभेचे सदस्य असणे ही सर्व बियाणी परिवारासाठी गौरवाची बाब असल्याचे प्रतिपादन संस्थेचे अध्यक्ष ओमप्रकाश लड्ढायांनी केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संविधान सभा समितीमध्ये वऱ्हाड प्रांतातील डॉ. पंजाबराव देशमुख तसेच ब्रजलाल बियाणी या दोन सदस्यांचा समावेश होता.डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनी श्री.ब्रजलाल बियाणी शिक्षण संस्थेत आयोजित अभिवादन कार्यक्रमाप्रसंगी ब्रजलाल बियाणी



यांच्या शतकोत्तर जयंतीनिमित्त त्यांचा समावेश असलेल्या संविधान सभेच्या सदस्यांचे समूह छायाचित्र अनावरण कार्यक्रमाचे देखील यावेळी आयोजन करण्यात आले होते. यावेळी महापरिनिर्वाण दिनानिमित्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना तसेच ब्रजलाल बियाणी यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले.कार्यक्रमाला शिक्षण समितीचे पदाधिकारी देवदत्त शर्मा, सुनीलकुमार गोयंका,ब्रजलाल बियाणी यांचे नातू राजीवजी बियानी यांची प्रमुख उपस्थिती होती. मान्यवरांच्या हस्ते या समूह छायाचित्राचे अनावरण करण्यात आले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दीपक धोटे यांनी या दुर्मिळ छायाचित्र उपलब्ध करण्यासाठी खूप प्रयत्न केले.

धनवटे नॅशनल कॉलेज, नागपूर व श्री महात्मा फुले महाविद्यालय, वरुड या महाविद्यालयाचे प्राचार्य व तेथील शिक्षक रेड्डी सर व बुरघाटे सर, श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख व कार्यकारणी सदस्य हेमंत काळमेघ यांचे विशेष सहकार्य लाभले.या छायाचित्रांमध्ये एकूण ३८९ पहिल्या संविधान सभेच्या सदस्यांचा सहभाग आहे. या छायाचित्राच्या माध्यमातून ब्रजलाल बियाणी यांचा जीवनपट हा नवीन पिढीसमोर येईल तसेच संविधान निर्मितीसाठी आपल्या महामानवांना काय कष्ट घ्यावे लागले याची पण जाणीव या माध्यमातून होऊ शकते. पिढ्यानपिढ्या ही माहिती सातत्याने समोर यावी म्हणून हे छायाचित्र महाविद्यालयाच्या दर्शनी भागात लावण्याचे प्रयोजन केले आहे असेही प्राचार्य डॉ. दीपक धोटे यांनी यावेळी सांगितले. कार्यक्रमाला कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. सुरज हेरे यांनी केले व राष्ट्रीय सेवा योजनेच्या कार्यक्रमाधिकारी डॉ.सोनल मुंधडा, राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक तसेच मनीष महाजन यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रयत्न केले.

# व्यापाऱ्यांच्या कापूस कट्टीला बाजार समितीमध्ये लगाम

## अर्धा किलो कपात बंदचा निर्णय : शेतकऱ्यांचे वाचले क्विंटलमागे ५० रुपये

## सभापती हरीश मोरे यांचे शेतकऱ्यांकडून अभिनंदन !

**दि.९विदर्भ प्रजासत्ताक अमरावती –** येथील बाजार समितीमध्ये शेतकऱ्यांचा कापूस खरेदी करताना क्विंटलमागे अर्धा किलोची कपात (कट्टी) व्यापाऱ्यांद्वारे केली जायची. मात्र सभापती, उपसभापती, अडते व खरेदीदार यांच्यात बैठक होऊन, ही कट्टी शुक्रवारपासून बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यामुळे शेतकऱ्यांचे क्विंटलमागे ५० रुपये वाचले आहे.

साधारणपणे फेडरेशन बंद झाल्यापासून कापूस बाजार समित्यांमध्ये विक्री होऊ लागला व तेव्हापासून व्यापाऱ्यांद्वारा क्विंटलमागे ५०० ग्रॅम कट्टी आकारल्या जायची व यासाठी विविध कारणे देण्यात येत असे. याशिवाय कापूस खरेदी केल्यानंतर व्यापाऱ्यांद्वारा शेतकऱ्यांना थेट पेमेंट होत असताना काही अडत्यांद्वारे क्विंटलमागे १५ रुपयांची अडत आकारणी व्हायची. त्यामुळे शेतकऱ्यांकडून क्विंटलमागे ५० रुपये नियमबाह्यरीत्या घेतल्या जात असल्याच्या शेतकऱ्यांच्या तक्रारी होत्या. त्यामुळे सभापती हरीश मोरे यांनी गुरुवारी संबंधितांची बैठक बोलावली. यामध्ये कट्टी बंद करण्याचा शेतकरी हिताचा निर्णय घेतला आहे.

यावेळी उपसभापती भैयासाहेब निर्मळ, संचालक राजेश पाटील, प्रमोद इंगोले, खरेदीदार राजेश पमनानी, इब्राहीम मन्सुरी, अनिल पनपालिया, शंकर आहुजा यांच्यासह सचिव दीपक विजयकर, पवन देशमुख आदी उपस्थित होते.

### ...तर अडते, दलालावर कारवाई

या बैठकीमध्ये कापूस विक्रीसाठी शेतकऱ्यांजवळून अडत व दलाल घेण्यात येऊ नये, असा निर्णय घेण्यात आला. त्यामुळे शेतकऱ्यांजवळून अशा प्रकारे अडत किंवा दलाली घेतल्यास व याबाबत शेतकऱ्याची तक्रार प्राप्त झाल्यास कृषी उत्पन्न खरेदी विक्री (प्रचालन व सुविधा) अधिनियम १९६३ नुसार कारवाई करण्यात येणार असल्याचे सभापती हरीश मोरे यांनी सांगितले.



## शिवपुराण कथांमध्ये सोनपोत लांबविणाऱ्या २६ महिलांना कोठडीची हवा

### मध्यप्रदेशात विविध गुन्हे : पाच ग्रॅम सोने हस्तगत



**दि.८विदर्भ प्रजासत्ताक, जळगाव:** नाशिक, धुळे व अन्य ठिकाणी झालेल्या श्री शिवमहापुराण कथांमध्ये सोनपोत लांबविणाऱ्या मध्यप्रदेशातील २६ महिला व एक अल्पवयीन मुलगी जळगाव पोलिसांच्या जाळ्यात अडकल्या. ही गँग मध्यप्रदेशातील असून त्यांच्यावर तेथे चोरी, घरफोडी, सोनपोत चोरी असे वेगवेगळे गुन्हे दाखल असल्याची माहिती जिल्हा पोलिस अधीक्षक एम. राजकुमार यांनी दिली. दरम्यान, वडनगरी फाटा येथे सुरू झालेल्या श्री शिवमहापुराण कथेच्या ठिकाणाहून लांबवलेल्या ३२ ग्रॅम सोन्यापैकी पाच ग्रॅम सोने हस्तगत करण्यात आले असून २६ महिलांना न्यायालयाने चार दिवसांची पोलिस कोठडी सुनावली तर अल्पवयीन मुलीची बालसुधार गृहात रवानगी करण्यात आली आहे.

वडनगरी फाटा येथे सुरू झालेल्या श्री शिवमहापुराण कथेच्या ठिकाणी सोनपोत चोरीसह चोरीच्या विचाराने संशयितरित्या काही महिला फिरत असल्याचे आढळून आल्याने स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने तब्बल २६ महिलांना अटक केली. पोलिसांनी त्यांची कसून चौकशी केल्यानंतर या टोळीने मध्यप्रदेश, राजस्थानसह महाराष्ट्रातील मालेगाव, नाशिक व धुळे याठिकाणी पार पडलेल्या शिवमहापुराण कथेमध्ये हातसफाई केल्याचे उघड झाले.ही टोळी मध्यप्रदेशातील धडेली हाडी पिंप्री, बरडीया, हिंगोलीया, धडेली चारभूजा, हाडी पिपल्या, बरखेडा या गावातील आहे. या टोळीतील सदस्य एकमेकांचे नातेवाईक असून १३ संशयित एका गावातील तर ८ संशयित महिला एका गावातील अन्य इतर गावातील असल्याचे समोर आले असून त्यांच्याविरुद्ध तब्बल २१ गुन्ह्यांची नोंद आहे.

### कथेच्या ठिकाणी सोनपोतवर असायचे लक्ष

पंडीत प्रदीप मिश्रा यांच्या श्री शिवमहापुराण कथेच्या ठिकाणी ही टोळी गर्दीचा फायदा घेत सोनसाखळी लांबवित असे. या टोळीने मालेगाव, धुळे याठिकाणी पार पडलेल्या कथेमध्ये देखील हातसफाई केली. या टोळीकडून सुमारे ५ ग्रॅम सोने हस्तगत करण्यात आले आहे.

## किरण पातूरकर यांच्या पुढाकाराने

## शहरात आयटी पार्क बनविण्याच्या हालचालींना वेग

### उद्योजक व नागरिकांच्या बैठकीत एकमुखी मागणी



**दि.९विदर्भ प्रजासत्ताक अमरावती –** शहरात आयटी पार्क निर्माण व्हावा याकरिता केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांना निवेदन देण्यात येणार असल्याचा प्रस्ताव पारित करण्यात आला. एमआयडीसी असोसिएशनचे अध्यक्ष किरण पातुरकर यांच्या पुढाकाराने शहरातील सर्व उद्योजक व प्रतिष्ठित नागरिकांची बैठक आयोजित करण्यात आली.

अमरावतीमध्ये आयटी पार्क करण्यात यावा, अशी एकमुखी मागणी शहरातील

सर्व सॉफ्टवेअर आणि आयटी उद्योगाशी संबंधित उद्योजक व प्रतिष्ठीत नागरिक आणि महाविद्यालयाचे प्राध्यापक यांनी या बैठकीत केली. एमआयडीसीचे अध्यक्ष किरण पातुरकर यांच्या पुढाकाराने उद्योजक व नागरिकांची बैठक आयोजित करण्यात आली. या बैठकीचे आयोजन किरण पातूरकर, रवि खांडेकर, दीपक

पोहेकर यांनी केले. या बैठकीत एक कृती समिती स्थापन करून त्या द्वारे एक निवेदन तयार करून किरण पातूरकर यांच्या नेतृत्वात राज्याचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, पालकमंत्री तसेच केंद्रीयमंत्री नितीन गडकरी यांना देण्याचे ठरले. या बैठकीला अभियांत्रिकी महाविद्यालयाचे डॉ. प्राचार्य डॉ. गजेंद्र बामनोटे, हांडे - डॉ. श्रीनिवास देशपांडे, वीरेंद्र लड्ढा, दिलीप बागडे, प्रा. नितीन मांडवगडे, दिलीप अग्रवाल, प्रा. सर्वेश राठी, प्रा. डॉ. विजय गुल्हाने, प्रा. प्रवीण करडे, डॉ. रणजीत केवले, प्रा. मुकुल भोंडे, प्रा. विजय धोटे, डॉ. प्रेमचंद अंभोरे, श्रीकांत पांडे, अमित गायकवाड, दिनेश सतांगे, पियूष , भूषण बारबुध्दे, संजय दिवाण, नितीन वाळके, सुधीर ढोले, शरिक शेख, अमित सावरकर, राजस सोनारे, गजानन देशमुख, दीपक खतडे, राजेश आखेगावकार, प्रवीण वैश्य व तिन्ही एमआयडीसी असोसिएशनचे अध्यक्ष, आयटी कंपनीचे संचालक, महाविद्यालयाचे प्राचार्य, प्राध्यापक, अमरावती कॉम्पुटर डीलर असोसिएशनचे अध्यक्ष उपस्थित होते.

## भातकुली तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनीचा बक्षिस वितरण सोहळा

### प्राथमिक विभागातुन श्रावण सोनोने,साऊर तर माध्यमिक विभागातुन अमन रामटेके,रामा यांच्या प्रतिकृती प्रथम

**दि९विदर्भ प्रजासत्ताक भातकुली–** ५१ नवी भातकुली तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनी जिल्हा परिषद माध्यमिक शाळा उत्तमसरा येथे दिनांक ७ व ८ डिसेंबर २०२३ या तारखेला उस्फूर्तरीत्या पार पडली.या प्रदर्शनीकरिता तालुक्यातील प्राथमिक व माध्यमिक विभागातील विविध शाळेच्या बालवैज्ञानिकांनी आपल्या प्रतिकृती सादर केल्या. प्राथमिक विभागातून एकूण ३३ प्रतिकृती व माध्यमिक विभागातून एकूण २९ प्रतिकृती विद्यार्थ्यांनी आणल्या होत्या.

त्या व्यतिरिक्त शिक्षक प्रतिकृती देखील विज्ञान प्रदर्शनी मध्ये आल्या होत्या. तालुका स्तरीय विज्ञान प्रदर्शनीच्या



समारोप या कार्यक्रमांमध्ये बक्षीस वितरणाचा कार्यक्रमाचे अध्यक्ष भातकुली पं.स.चे गट शिक्षणाधिकारी दिपक कोकतरे होते तर विशेष अतिथी थोर शास्त्रज्ञ डॉ.महेंद्रकुमार रॉय होते आणि प्रमुख अतिथी शा. पो.आ. अधिक्षक नरेंद्र गायकवाड, मुख्या. लोमेश खैरकर, डायट अधिव्यखाता दिपक चांदुरे,केंद्र प्रमुख निता सोमवंशी,गोपाल वडतकर, कु.श्वेता आर.पांडे, मुख्या. श्रीमती मिनाक्षी इंगळे, चंद्रशेखर गुडवारे, श्रीकांत नांदुरकर, गुल्हाने मॅडम उपस्थित घेण्यात आला या प्रदर्शनीमध्ये क्रमांक प्राप्त विद्यार्थ्यांन मध्येप्राथमिक विभाग प्रथम क्रमांक–श्रावण निलेश सोनोने दादा भामोदकर कृषी विद्यालय साऊर द्वितीय क्रमांक १) रुद्र सुधीर ढोके२) प्रथमेश सुरेश जुवारजिल्हा परिषद पूर्व माध्यमिक मराठी शाळा धामोरीतृतीय क्रमांक– कु. स्वरा प्रवीण मोरे

आदर्श इंग्लिश प्राइमरी स्कूल भातकुलीप्रोत्साहन पर १) कु.विशाखा ठाकरे जिल्हा परिषद शाळा आष्टी.२)कु.श्रावणी कथे कु.वेदिका मानकर जनता हायस्कूल पूर्णा नगर .३)कु.ईश्वरी लांडे कु.श्रुतिका लामसे जिल्हा परिषद पूर्व माध्यमिक शाळा आसरा.माध्यमिक विभाग

प्रथम क्रमांक– अमन शामराव रामटेकेदिगंबर महाराज हायस्कूल रामा.द्वितीय क्रमांक १) समर्थ सुनील मानकर २)मोहित प्रमोद टाकळेजिल्हा परिषद माध्यमिक हायस्कुल उत्तम सरा.तृतीय क्रमांक गौरी संतोष जाधव पुरोगामी विद्यालय आसराप्रोत्साहन पर १) संजीवनी समदुरे २)गौरी चहाकार संत गाडगेबाबा विद्यालय सायत. शिक्षक प्रतिकृती प्राथमिक विभाग– प्रथम क्रमांक पंकज दहीकर सरजिल्हा परिषद पूर्व माध्यमिक शाळा आसराद्वितीय क्रमांक श्याम चौकडे सरजिल्हा परिषद पूर्व माध्यमिक शाळा रामा

तृतीय क्रमांक अशोक बोबडे पुरोगामी विद्यालय आसराशिक्षक प्रतिकृती माध्यमिक विभागप्रथम क्रमांक संजय गेडाम सर पंजाबराव कुचे विद्यालय वीरशी द्वितीय क्रमांक एम पी सोनटक्के मॅडमसंत गाडगेबाबा विद्यालय सायत

तृतीय क्रमांक संजय हिंगणे,राष्टीय शेतकी विद्यालय खोलापुर यांच्या प्रतिकृतीला मिळाला.सर्व सहभागी बालवैज्ञनिक व विजयी विद्यार्थांना स्मृती चिन्ह आणि प्रमाणपत्र वितरीत करण्यात आले. यावेळी थोर शास्त्रज्ञ डॉ.महेंद्रकुमार रॉय यांचे विज्ञानावर व्याख्यान झाले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक गोपाल वडतकर यांनी तर सुत्र संचालन शितल भोपाळे ,आभार संतोष कुर्हेकर यांनी केले.कार्यक्रम यशस्वी करण्याकरीता शाळेचे मुख्याध्यापक लोमेश खैरकर,संतोष कुर्हेकर,अश्विनी झाडे,शितल भोपाळे,उमेश बसरे,प्रतिभा नांदणे,जोत्स्ना हायगले,मिनाक्षी इंगळे,गजानन येलोने,राजेश सावरकर,भूषण बुरंगे,दिपा गजघाटे आणि शाळेचे विद्यार्थी यांचे सहकार्य लाभले.

## मेळघाटातील आरोग्य यंत्रणेवर आ. राणा यांची अधिवेशनात लक्षवेधी

### डॉक्टर्स, नर्स, आरोग्यसेवकांच्या रिक्त जागा भरण्याची मागणी

**दि.९विदर्भ प्रजासत्ताक अमरावती :** मेळघाटातील निष्क्रीय आरोग्य यंत्रनेवर आ. रवी राणा यांनी लक्षवेधी मांडत तेथील आरोग्य यंत्रना सक्षम करण्याकरीता त्वरीत रीक्त जागा भरण्याची मागणी केली तसेच इर्विन व डफरीने येथे सुविधांकरीता अतिरीक्त निधी देण्याची देखील मागणी यावेळी अधिवेशानादरम्यान करण्यात आली विधानभवनात जिल्ह्यातील आरोग्य प्रश्नावर आमदार रवी राणा यांनी आरोग्यमंत्री तानाजी साद यांना घेरले जिल्ह्यातील ५० टक्के रिक्त असलेल्या



डॉक्टर, नर्स, आरोग्य सेवक यांच्या रिक्त जागा भरणे, जिल्हा सामान्य रुग्णालयाची बेड क्षमता ३०० वरून ७५० करणे, जिल्हा सी रुग्णालयाच्या नवीन इमारतीचे लोकार्पण करणे आदी बाबीसाठी तत्काळ मजुरी मिळण्याचा आग्रह अधिवेशनात करण्यात आला मेळघाटमध्ये नवजात शिशु मृत्यूचे प्रमाण सर्वात जास्त आहे. हे रोखण्यासाठी धारणी, चिखलदरा, चुरणी या मुख्य भागासह मेळघाटातील ग्रामीण व अतिदुर्गम भागात असणारे तालुका रुग्णालय, प्रादमिक आरोग्य केंद्र आदी ठिकाणी तातडीने डॉक्टर्स, नर्स, आरोग्यसेवक आदी रिक्त जागा भरून वैद्यकीय सुविधा व आवश्यक यंत्रसामुग्री उपलब्ध करून देण्याची मागणी आरोग्यमंत्री तानाजी सावत याच्याकडे आ रवी राणा यानी लक्षवेधी द्वारे माडली सर्व मागण्याची तत्काळ दखल घेवून २ महिन्याच्या आत या समस्या निकाली काढण्याचे अभिवचन सभागृहात दिले.

## होय..पावसाळा संपला अन राज्यातील ९ जिल्ह्यांत टँकरने पाणीपुरवठा

**दि.९विदर्भ प्रजासत्ताक अमरावती :** राज्य शासनाने 'हर घर जल' व 'जलजीवन मिशन'अंतर्गत कोट्यवधींचा निधी खर्च केला. मात्र या वर्षी मान्सूनच्या परतीचा प्रवास सुरू झाला आणि ९ जिल्ह्यांतील ३१४ गावांमध्ये टँकरने पाणीपुरवठा करण्याची वेळ आली. राज्य शासनानेच विधानपरिषदेत ही कबुली दिली आहे.

अशा स्थितीत उन्हाळ्यात राज्यातील अनेक गावांमध्ये भीषण पाणीसमस्या निर्माण होण्याचीच भिती आहे.

राजेश राठोड, भाई जगताप, अभिजीत वंजारी इत्यादी सदस्यांनी राज्यातील पाणी



टंचाईग्रस्त गावे-वाड्यांबाबतचा तारांकित प्रश्न उपस्थित केला होता. यावर पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील यांनी लेखी उत्तरातून शासनाची भूमिका मांडली. ऑक्टोबरच्या दुसऱ्याच आठवड्यात राज्यातील ९ जिल्ह्यांमधील ३१४ गावे व ९९२ वाड्यांना टँकरने पाणी पुरवठा करण्याची वेळ आली. ३५ शासकीय व २८९ खाजगी टँकरने पाणीपुरवठा सुरू झाला.

नाशिक जिल्ह्यात सर्वाधिक ८७ टँकर्सने पुरवठा करण्यात आला, असे पाटील यांनी स्पष्ट केले. राज्यातील अनेक गावांमध्ये भीषण पाणीटंचाई निर्माण होण्याची शक्यता आहे. अशा गावांना कायमस्वरूपी पाणीपुरवठा करण्यासाठी जलजीवन मिशनअंतर्गत मंजूर कामे तातडीने पूर्ण करण्यावर भर देण्यात येत असल्याचे शासनाच्या उत्तरात नमूद आहे.

## बाबा रामदेव १० हजार कोटी रुपयांची गुंतवणूक करणार, हजारो रोजगाराच्या संधी निर्माण होणार

**दि.८विदर्भ प्रजासत्ताक नागपुर–**पतंजलीचे संस्थापक योगगुरु बाबा रामदेव येत्या काही दिवसांत १० हजार कोटी रुपयांची गुंतवणूक करणार आहेत. विकसित भारत निर्माण करण्याच्या आपल्या संकल्पाचा पुनरुच्चार करताना त्यांनी गुंतवणुकीबाबत वर्तव्य केलं. या प्रस्तावित गुंतवणुकीमुळं हजारो लोकांसाठी रोजगाराच्या संधी निर्माण होणार आहेत. बाबा रामदेव उत्तराखंड ग्लोबल इन्व्हेस्टर्स समिट २०२३ मध्ये सहभागी झाले होते. समिट दरम्यान त्यांनी १० हजार कोटी रुपयांच्या गुंतवणुकीची घोषणा केली आहे.

**या उद्योगपतींनी समिटला लावली हजेरी–** बाबा रामदेव उत्तराखंड ग्लोबल इन्व्हेस्टर्स समिट २०२३ मध्ये सहभागी झाले होते. ही शिखर परिषद



आज ८ डिसेंबरपासून सुरू झाली असून ९ डिसेंबरपर्यंत चालणार आहे. या शिखर परिषदेचे उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते झाले. अदानी समुहाचे संचालक आणि कृषी आणि तेल आणि वायू व्यवसायाचे प्रमुख प्रणव अदानी, गडथ चऊ सज्जन जिंदाल, खढ्ढउ चऊ संजीव पुरी, कल्याण चक्रवर्ती, ढतड सप्लाय चेन सोल्युशन्सचे अध्यक्ष आर. दिनेश आदी या समिटला उपस्थित आहेत.

### बाबा यांचे गुंतवणूकदारांना आवाहन

बाबा रामदेव यांनी आपल्या भाषणात पंतप्रधानांच्या विकसित भारताच्या व्हिजनचा उल्लेख केला. त्यांनी सर्व गुंतवणूकदारांना भारताचा विकास करण्याचा आणि देशाला जागतिक आर्थिक शक्तीस्थान बनवण्याचा पंतप्रधानांचा संकल्प बळकट करण्याचे आवाहन केले. बाबा रामदेव यांनी देशाला ५ ट्रिलियन डॉलरची अर्थव्यवस्था बनवण्याचा उल्लेख देखील केला. तसेच विकसित भारतासाठी पतंजलीच्या योगदानाबाबतही बाबा रामदेव यांनी माहिती दिली.

# राज्यात ऑक्टोबर महिन्यात कुपोषणामुळे ८५२ बालकांचा मृत्यू, धक्कादायक आकडेवारी

**दि.९विदर्भ प्रजासत्ताक नागपूर**



एकीकडे महाराष्ट्र १ ट्रिलियन इकॉनॉमीचं स्वप्न पाहात आहे. उद्योग क्षेत्रात महाराष्ट्र पहिल्या क्रमांकाचं राज्य होणार असल्याचं राज्याच्या प्रमुखांकडून सांगण्यात येतं. मात्र, दुसरीकडे आजही कुपोषणामुळे शेकडो बालकांना आपला जीव गमवावा लागत असल्याची धक्कादायक आकडेवारी समोर येत आहे. कुपोषणाच्या गंभीर समस्येवर शासनस्तरावरून सातत्याने उपाययोजना सुरू असतात. मात्र, अद्यापही कुपोषणाचा नायनाट करण्यात सरकारला अपयश आलं आहे. त्यावरुन, राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष जंयत पाटील यांनी राज्य सरकारवर जोरदार निशाणा साधला आहे.

नाशिक शहरात सप्टेंबर महिन्यात कुपोषणामुळे दोन महिन्यांच्या बाळाचा उपचारादरम्यान मृत्यू झाला होता. तर, मेळाघाट आणि आदिवासी भागातील बालकांसाठी ही समस्या अधिक गंभीर आहे. त्यामुळे, शासनाने याकडे गांभीर्याने पाहणे आणि योग्य ती उपाययोजन करणे गरजेचे आहे. त्यातच, ऑक्टोबर महिन्यात कुपोषणामुळे राज्यात तब्बल ८५२ बालमृत्यूंची नोंद झाल्याचं वाचण्यात आलं, असे जयंत पाटील यांनी म्हटलं आहे. राज्य सकारचं हिवाळी अधिवेशन सुरू असताना राज्यातील अनेक प्रश्नांकडे विरोध लक्ष वेधत आहेत. आज जयंत पाटील यांनी कुपोषणाच्या प्रश्नाकडे लक्ष वेधले आहे.

''राज्यात ऑक्टोबर महिन्यात कुपोषणामुळे तब्बल ८५२ बालमृत्यूंची नोंद झाल्याची बाब वाचनात आली. ही बाब फार चिंताजनक आहे. राज्यकर्त्यांना आकड्यांची जुळवाजुळव आणि पत्रप्रपंचातून वेळ मिळाला तर त्यांनी या परिस्थितीकडे लक्ष द्यावे. महागाई व अपुऱ्या वैद्यकीय सोयीसुविधा हेच या सर्वांचे मूळ आहे,'' असे जयंत पाटील यांनी म्हटले. तसेच, सरकारनं तातडीने यावर उपाययोजना राबवून अंमलबजावणी करायला हवी, अशी मागणीही त्यांनी केली आहे. दरम्यान, राज्य सरकारचं हिवाळी अधिवेशन सुरू असताना नवाब मलिक यांच्या उपस्थितीवरुन आणि त्यांच्या भूमिकेवरुन रणकंदन होताना दिसत आहे. राज्यातील मूळ प्रश्न बाजुला राहून आरोप-प्रत्यारोपांवर चर्चा होऊन एकमेकांवर टीका-टीपण्णीच होत असल्याचं दिसून येतं. त्यामुळे, जनतेच्या प्रश्नांबाबत खरंच सत्ताधारी आणि विरोधकही गंभीर आहेत की नाहीत, हाही खरा प्रश्न आहे.

# स्व.दत्तात्रय पुसदकर कला महाविद्यालयाला नॅकचे 'बी++' श्रेणीत मानांकन

**दि.९विदर्भ प्रजासत्ताक नांदगाव पेठ**



स्व. दत्तात्रय पुसदकर शिक्षण संस्था, अमरावती द्वारा संचालित नांदगाव पेठ येथील स्व. दत्तात्रय पुसदकर कला महाविद्यालय येथे बेंगलोर येथील नॅक समितीने दिनांक ३० नोव्हेंबर व १ डिसेंबर २०२३ रोजी भेट दिली होती. नांदगाव पेठ सारख्या ग्रामीण भागात असलेल्या या महाविद्यालयाला त्यांच्या शैक्षणिक, सामाजिक आणि आवश्यक असलेल्या सर्व निकषांची पूर्तता करत नॅक समितीने 'बी++ (सी जी पी ए २.८३) हे मानांकन देउन या महाविद्यालयाला सन्मानित केले आहे. विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ परिक्षेत्रातील पाचही जिल्हयामधून ग्रामपंचायत क्षेत्रातील नॅक समिती द्वारे 'बी++' हे उच्च मानांकन दर्जा मिळवणारे हे एकमेव महाविद्यालय ठरले आहे. उच्च शिक्षण क्षेत्रातील गुणवत्ता वाढीसाठी 'राष्ट्रीय मूल्यांकन व अधिस्वीकृती समिती' (नॅक) ची स्थापना केंद्र सरकार द्वारे करण्यात आली असून, देशातील सर्व महाविद्यालयाना व विद्यापीठांना नॅक समिती कडून मूल्यांकन करून घेणे क्रमप्राप्त आहे. त्या अनुषंगाने महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध असलेल्या विविध सोयीसुविधा, व्यायामशाळा, ग्रंथालय, संगणकीकरण, एन.एस.एस. (राष्ट्रीय सेवा योजना), गुणवतापूर्ण शिक्षण व संशोधन सुविधा, नवीन शैक्षणिक धोरणाच्या अनुषंगाने महाविद्यालयाची तयारी यासोबतच सामाजिक आरोग्याच्या दृष्टीने एड्स जनजागृती, सार्वजनिक स्वच्छता, पर्यावरण जनजागृती, मतदार जागृती, मानवी हक्क, संविधानिक मुद्द्यांची रुजवणुक, स्त्रीपुरुष समानता, महीला व बालकांचे शोषण व अत्याचार प्रतिबंधक कायद्याबाबत जनजागृती विविध सामाजिक उपक्रम व प्रश्नाबाबत समितीने महाविद्यालयाचे मूल्यांकन करुन गुणदान करण्यात आले. त्या आधारे महाविद्यालयास 'बी ++' श्रेणी प्रदान करण्यात आली. या समितीचे अध्यक्ष म्हणून राणी चन्नम्मा युनिव्हर्सिटी, बेळगाव, कर्नाटक, येथील अर्थशास्त्र विभागाचे डीन डॉ. तलवार सबण्णा आणि मेंबर कॉर्डिनेटर म्हणून तिरुचनगोडे, तमिळनाडू येथील विद्या विकास कॉलेज ऑफ एज्युकेशन चे प्राचार्य डॉ. दिनेशकुमार रामामुर्थी यांनी महाविद्यालयाचे विविध निकषावर परिणामकारक मूल्यांकन करून अहवाल सादर केला. समितीने महाविद्यालयाचे व्यवस्थापन मंडळ, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी वृंद, माजी विद्यार्थी, पालक आणि नियमित विद्यार्थी यांच्याशी संवाद साधला.

महाविद्यालयातील सर्व विभागांना भेटी देऊन सर्व उपक्रमावर बद्दल माहिती घेतली. विद्यार्थ्यांनी भारतीय कला व संस्कृती या विषयावर सांस्कृतिक कार्यक्रम सादर केला. यापुढे महाविद्यालयात आणखी चांगले व्यवसायाभिमुख कौशल्य आधारित असे अभ्यासक्रम सुरु करण्यात येणार आहेत. तसेच पदव्युत्तर स्तरावर इतिहास, मराठी, डिप्लोमा इन फॅशन डिझायनिंग आणि बी कॉम हे नवीन अभ्यासक्रम पुढील वर्षी प्रस्तावित आहे. या दुसऱ्या फेरीची मानांकन प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी स्व. दत्तात्रय पुसदकर शिक्षण संस्था अमरावती चे अध्यक्ष श्रीमती वृषालीताई पुसदकर, उपाध्यक्ष निदान बारस्कर, सचिव श्रीकृष्ण बाळापुरे, कोषाध्यक्ष ज्ञानेश्वर हिवसे, सदस्य रेवन पुसदकर व संस्था कार्यकारिणीचे मार्गदर्शनात अधिक उच्च मानांकन मिळवण्यासाठी प्राचार्य डॉ. विजय दरणे यांच्या नेतृत्वात नॅक समन्वयक प्रा. डॉ. पंकज मोरे आणि महाविद्यालयाचे पूर्णवेळ प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी वृंद या सर्वानी भरपूर मेहनत घेतली. महाविद्यालयाच्या या यशामध्ये स्व. दत्तात्रय पुसदकर शिक्षण संस्थेची संपूर्ण कार्यकारिणी, महाविद्यालय विकास समितीचे सदस्य, माजी विद्यार्थी, पालक या सर्वाचे मार्गदर्शन आणि नियमित विद्यार्थ्यांचे सहकार्य लाभले अशी माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजय दरणे व अंतर्गत गुणवता कक्षाचे समन्वयक प्रा. डॉ. पंकज मोरे यांनी दिली.

# गौण खनिज उत्खनन करणाऱ्यांवर कारवाई

## जावरा तहसीलदारांनी ठोठावला तीस लाखांचा दंड

**दि.९विदर्भ प्रजासत्ताक ब्राम्हणवाडा थडी १५**



तालुक्यातील ब्राम्हणवाडा थडी नजीक चिचोली येथील गावकर्यांनी परीसरात होत असलेल्या गौणखनिजांच्या अवैध उत्खनावर कारवाईची तक्रार तहसिलदार गीतांजली गरड यांचेकडे केली होती. त्याची चौकशी करुन मुरुमाचे अवैध उत्खनन झाल्याचे स्पष्ट झाल्याने संबधीत गटधारकाला ३० लाखाचा दंड करण्यात आला. मात्र तक्रारीत नमुद केलेला अन्य गटधारक गोलु याचेवर कारवाई केव्हा? असा प्रश्न आता तक्रारकांनी केला आहे. तक्रारीत दोघांची नावे असतांना गोलुला अभय का देण्यात आले असा प्रश्न सुध्दा उपस्थित झाल्याने महसुल विभागाच्या एकतर्फी कारवाईवर शंका व्यक्त केल्या जात आहे.

तहसिलदार गीतांजली गरड यांनी नुकतीच अवैध गौण खनिज उत्खनन वाहतूक प्रतिबंध करण्यासाठी उपविभागीय अधिकारी अचलपुर श्रीकांत उंबरकर यांचे मार्गदर्शनात चांदुर बाजार तालुक्याकरिता

एक मंडळ अधिकारी यांच्या नेतृत्वात सहा तलाठयांचे एक पथक निर्माण केले. त्यावर नियंत्रण म्हणून संबंधित नायब तहसीलदारांची नियुक्ती करण्यात आली. त्यामुळे आता दररोज अवैध उत्खनन व वाहतूक किंवा रेती, मुरूम साठा आढळून आल्यास त्यावर तत्काळ कार्यवाही करण्यात येत आहे.

गेल्या सहा महिन्यात ५१० ब्रास रेतीसाठा जप्त करुन घरकुल लाभार्थ्यांना मोफत व शासकिय कामासाठी कंत्राटदाराकडुन रॉयल्टी घेऊन वितरीत करण्यात आला. तालुक्यातील जावरा येथील मुरूम उत्खननावर तहसीलदार गीतांजली गरड यांनी एका प्रकरणात ३०

लाख ९ हजार ९३० रुपयांचा दंड ठोठावला आहे. ब्राह्मणवाडा थडी लगत असलेल्या चिंचोली येथील ग्रामस्थांनी केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने मौजा जावरा येथील गट नंबर ८९ येथे होत असलेल्या अवैध उत्खननाबाबत तलाठी, मंडळ अधिकारी सार्वजनिक बांधकाम विभागाचे अभियंता यांचे अहवाल प्राप्त झाल्यानंतर सर्व चौकशी करून सदर मुरूम खदानीची भूविज्ञान व खनिज संचालना नागपूर (इ टी एस मार्फत अचूक मोजणी करण्यात आली.

या मोजणीमध्ये संबंधित खदानी लगत विनापरवाना केलेले ३८२.३२ ब्रास मुरमाचे अवैध उत्खनन आढळून आले. या आधारावर तहसीलदार गीतांजली गरड यांनी संबंधित गट धारकावर दंड आकारला, या कारवाईमुळे तालुक्यातील अवैध गौण खनिज उत्खनन आणि अवैध वाहतुक करणार्यावर चांगलाच वचक बसला आहे.

# हवामान बदलामुळे नऊ महिन्यांत तीन हजार मृत्यू

## 'सेंटर फॉर सायन्स अँड एन्व्हायर्नमेंट'च्या अहवालातून देशातील धक्कादायक आकडेवारी

**दि. ९ विदर्भ प्रजासत्ताक नागपूर ११**




हवामान बदलामुळे मोठी मनुष्यहानी होत असून, देशात यंदाच्या नऊ महिन्यांत हवामान बदलामुळे तीन हजार जणांचा मृत्यू झाल्याची धक्कादायक माहिती 'सेंटर फॉर सायन्स अ‍ॅन्ड एन्व्हायर्नमेंट'च्या अहवालातून उघड झाली आहे.

देशात जानेवारी ते सप्टेंबर २०२३ या कालावधीत बहुतांश दिवस अत्यंत तीव्र हवामान होते. या कालावधीत सुमारे २,९२३ जणांचा मृत्यू झाला. जवळपास २० लाख हेक्टरवरील पिके उद्ध्वस्त झाली. ८० हजार घरे नष्ट झाली आणि ९२ हजारांहून अधिक प्राण्यांचा मृत्यू झाला. हा आकडा अधिकही असू शकतो, असे या अहवालात म्हटले आहे. बिहारमध्ये ६४२, हिमाचल प्रदेशात ३६५ आणि उत्तर प्रदेशात ३४१ जणांच्या मृत्यूची नोंद झाली.

पंजाबमध्ये सर्वाधिक प्राणी मृत्युमुखी पडले. हिमाचल प्रदेशमध्ये अतिवृष्टीमुळे सर्वाधिक घरांचे नुकसान झाले. केरळमध्ये हवामान बदलाच्या सर्वाधिक ६७ दिवसांची नोंद झाली, तर राज्यात ६० जणांचा मृत्यू नोंदवले गेले. तेलंगणात ६२ हजार हेक्टरपेक्षा अधिक पीक क्षेत्रावर परिणाम झाला. या राज्यात प्राण्यांच्या मृत्यूचे प्रमाणही लक्षणीय आहे.कर्नाटकात सुमारे ११ हजारांहून अधिक घरे जमीनदोस्त झाली. हिमाचल प्रदेश, पंजाब, हरियाणा, उत्तराखंड आणि राजस्थानलाही हवमान बदलाचा मोठा फटका बसला. आसाममध्ये तीव्र हवामानामुळे १०२ दुर्घटनांची नोंद झाली, तर ४८ हजार हेक्टरपेक्षाही अधिक क्षेत्रावरील पिके नष्ट झाली. नागालँडमध्ये १,९०० घरे उद्ध्वस्त झाली. फेब्रुवारी महिना गेल्या १२२ वर्षांतील सर्वाधिक उष्ण ठरला.

**अतिवृष्टी, पूर, भूस्खलनामुळे मोठा विध्वंस**

नऊ महिन्यांतील २७३ दिवसांपैकी १७६ दिवस वीज कोसळणे आणि वादळामुळे देशात कुठेना कुठे दुर्घटनांची नोंद झाली. त्यात ७११ जण मृत्युमुखी पडले. त्यापैकी सर्वाधिक मृत्यू बिहारमध्ये झाले. अतिवृष्टी, पूर आणि भूस्खलनामुळेही मोठा विध्वंस झाला. त्यात १,९०० हून अधिक जणांना प्राण गमवावे लागले.

# जलजीवन योजनेची कामे पूर्ण करून घराघरांत नळाने पिण्याचे पाणी पुरवा : अजित पवार

**दि.९विदर्भ प्रजासत्ताक नागपूर**

केंद्र सरकारच्या 'हर घर, नल से जल' या अभियानाच्या माध्यमातून प्रत्येकाच्या घरात नळाने पिण्याचे पाणी पुरविण्याचा संकल्प प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केला आहे. यासाठी जलजीवन मिशन कार्यक्रमाअंतर्गत राबविण्यात येणाऱ्या पाणीपुरवठा योजनांची कामे अभियानस्तरावर पूर्ण करा, यासंदर्भातील सुधारित प्रशासकीय मान्यतेच्या प्रस्तावांतील त्रुटी दूर करून सादर कराव्यात, असे निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनीविधानसभेतून शुक्रवारी दिले.

पवार यांनी विधानभवनातील दालनात पाणीपुरवठा व स्वच्छता विभागातील जलजीवन मिशनमधील योजनांच्या सुधारित प्रशासकीय मान्यतेसंदर्भातील आढावा घेतला. यावेळी पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील, आमदार किरण लहामटे, देवेंद्र भुयार, राजू कारेमोरे, इंद्रनील नाईक, मनोहर चंद्रिकापुरे, वित विभागाचे अपर मुख्य सचिव डॉ.नितीन करीर, नियोजन विभागाचे प्रधान सचिव सौरभ विजय, ग्रामविकास विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले, पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाचे प्रधान सचिव डॉ. संजय खंदारे, महाराष्ट्र जीवन प्र प्राधिकरणाचे सदस्य सचिव अभिषेककृष्णा, मुख्य अभियंता मनीषा पलांडेयांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थितहोते.घरगुती नळजोडणी करून प्रत्येक कुटुंबाला शुद्ध पेयजल उपलब्ध करून देण्यास शासन कटिबद्ध आहे. या योजनेचे सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करताना त्रुटी राहिल्या असतील, तर त्या दुरुस्त करून प्रस्ताव सादर करावेत. तसेच त्रुटी ठेवणाऱ्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांवर कार्यवाही प्रस्तावित करावी. अशा सूचना अजित पवार यांनी दिल्यात.

# अप्पर वर्धा धरणग्रस्तांचे पुनर्वसन करा

**दि.९विदर्भ प्रजासत्ताक नागपूर :**

अप्पर वर्धा धरणग्रस्तांचेपुनर्वसन करण्याच्या मागणीसाठी अमरावती जिल्ह्यातील मोर्शी येथील अप्पर वर्धा धरणग्रस्त कृती समितीच्या वतीने विधिमंडळावर धडक मोर्चाचे आयोजन करण्यात आले. मोर्चात सहभागी धरणग्रस्तांनी आपल्या मागण्यांसाठी औरदार नारेबाजी करून शासनाचे लक्ष वेधून घेतले. अप्पर वर्धा धरणग्रस्त कृती समितीने शुक्रवारी ८ डिसेंबरला विधिमंडळावर मोर्चाचे आयोजन केले. यशवंत स्टेडियम येथून काढण्यात आलेला हा मोर्चा पोलिसांनी मॉरिस कॉलेज टी पॉइंट येथे अडविला. मोर्चात सहभागी धरणग्रस्तांनी आपल्या मागण्यांसाठी जोरदार नारेबाजी केली, मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, जलसंपदामंत्री, पुनर्वसनमंत्री व संबंधित अधिका-यांनी उच्चस्तरीय बैठकीचे आयोजन करून धरणग्रस्तांना दिलेल्या आश्वासनाची पूर्तता करावी, प्रकल्पग्रस्तांना पुनर्वसन कायद्यानुसार देय जमीन लाभक्षेत्रात किंवा इतरत्र देण्यात यावी, आदी मागण्या यावेळी करण्यात आल्या मोर्चात सहभागी कृती समितीचे पदाधिकारी अमोल महल्ले, उमेश शहाणे, प्रवीण बोले, गजानन पुरी, अनिल दहिवडे यांच्या शिष्टमंडळाने पुनर्वसनमंत्री अनिल पाटील यांना मागण्यांचे निवेदन सादर केले. त्यानंतर हा मौचर्चा मागे घेण्यात आला.

# 'मृत्युंजय दूत' संकल्पना राबविण्याबाबत निरुत्साह

**दि. ९ विदर्भ प्रजासत्ताक मुंबई**

महामार्गावर होणाऱ्या अपघातांमध्ये अपघात ग्रस्तांना तातडीची मदत मिळावी या दृष्टीने महामार्ग पोलीस मदत केंद्राच्या वतीने महामार्ग मृत्युंजय दुत संकल्पना राबविण्यात येत आहे. मार्च २०२१ मध्ये सुरू करण्यात आलेल्या या संकल्पनेतून महामार्गाच्या शेजारी राहणाऱ्या आणि अपघात ग्रस्तांना मदत करणाऱ्या नागरिकांची महामार्ग मृत्युंजय दुत म्हणून नेमणूक करण्यात आली. महामार्गावर अपघात ग्रस्तांना मदत करता यावी यासाठी मृत्युंजय दुतांना आवश्यक साधन सामग्री पुरवण्याचे आश्वासन महामार्ग पोलिसांकडून देण्यात आले. सुरुवातीला नागरिकांचा संकल्पनेला चांगला प्रतिसाद मिळाला. मात्र प्रत्यक्षात मृत्युंजय दुतांना आवश्यक साधन-सामग्री आणि सुविधा मिळत नसल्यामुळे अनेकांनी या संकल्पनेपासून लांब राहणे पसंत केले. त्यामुळे आता पुन्हा नवीन लोकांची मृत्युंजय दुत म्हणून नेमणूक करण्याचे काम महामार्ग पोलिसांकडून सुरू करण्यात आले आहे.

# समृद्धी महामार्गावर १६ नवीन पॉइंट विकसित करणार

## मंत्री दादा भुसे यांचा दावा: फूड झोन, स्वच्छतागृह, पिण्याच्या पाण्याची सुविधा राहणार

**दि.९ विदर्भ प्रजासत्ताक नागपूर**



हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्गाच्या ९०० किलोमीटरपैकी ७०० किलोमीटरचे काम झाले आहे. लवकरच दुसऱ्या टप्प्यातील शिल्लक काम पूर्ण करण्यात येईल. वाहतूक सुरू झाल्यापासून या महामार्गावर ६६ लाखांहून अधिक वाहने धावली. परंतु दुर्दैवाने ८६० अपघातांच्या घटना घडल्या. यात १४२ लोकांचा मृत्यू झाला. अपघातांना आळा बसावा, यासाठी समृद्धी महामार्गावर १६ नवीन पॉइंट विकसित करण्यात येणार असल्याची माहिती सार्वजनिक बांधकाम (उपक्रम) मंत्री दादा भुसे यांनी शुक्रवारी विधान परिषदेत लक्षवेधीच्या उत्तरात दिली.

समृद्धीवर फूड झोन, स्वच्छतागृह, पिण्याचे पाणी आदी व्यवस्था करण्यात येणार आहे. त्यासाठी निविदा काढण्यात आली आहे. संबंधित काम ४ महिन्यांत पूर्ण होण्याची शक्यता असल्याचे दादा भुसे म्हणाले, सदस्य अमोल मिटकरी, विक्रम काळे, अनिकेत तटकरे आदींनी लक्षवेधीच्या माध्यमातून हा प्रश्न उपस्थित केला होता. भुसे म्हणाले की, समृद्धी महामार्गावर किंवा अन्य कुठल्याही रस्त्यावर अपघात घडणे दुर्दैवी आहे. जांबरगाव येथे झालेल्या अपघातात १३ जणांचा मृत्यू झाला असून २३ जण जखमी झाले आहेत. दोषींवर कारवाई करण्यात आली. वाहतूक नियमाचे उल्लंघन करणाऱ्यांवर कडक कारवाई करण्यात येत आहे. समृद्धी मार्गावर ७३ मोठे अपघात झाले, त्यात १४२ लोकांना आपला जीव गमवावा लागला. अपघातानंतर जखमींना ५ ते १० मिनिटांत मदत उपलब्ध केली जात आहे वन्यप्राण्यांसाठी स्वतंत्र कॉरिडॉर करण्यात आले आहेत तरीही ते महामार्गावर येतात, अपघात होतात त्यांना आळा घालण्यासाठी महामार्गावर ७० टक्के भागात बॅरिअर बसविण्याचे काम पूर्ण झाले आहे. अपघाताची शक्यता असलेल्या जागेची माहिती देण्यासाठी फलक लावण्यात आले आहेत.

